जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# डीपीवरील वीज सुरू करण्यावरून वाद; कुटुंबाला दांडके व गजाने जबर मारहाण

नगर – नगर तालुक्यातील पांगरमल येथील कान्होबा वस्तीवर डीपीवरील वीज सुरू करण्याच्या किरकोळ कारणावरून एका कुटुंबाला लाकडी दांडके आणि लोखंडी गजाने जबर मारहाण करण्यात आली. या हल्ल्यात महिला, तिचे पती, मुलगा आणि शेतातील कामगार जखमी झाले आहेत. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नंदाबाई आव्हाड यांचा मुलगा अक्षय आणि शेतातील कामगार नितीन माळी हे डीपीवरील वीज सुरू करण्यासाठी गेले होते. त्यावेळी आरोपी अशोक आव्हाड, मुकेश आव्हाड, नागनाथ आव्हाड आणि रामदास आव्हाड यांनी दारूच्या नशेत येऊन, 'तू वीज का चालू करतोस?' असे म्हणत वाद घातला. वादाचे पर्यावसान शिवीगाळ आणि मारहाणीत झाले. त्यानंतर आरोपींनी घरासमोर येऊनही जीवे मारण्याची धमकी दिली.

या भीतीपोटी फिर्यादी नंदाबाई आव्हाड, त्यांचे पती हरिभाऊ, मुलगा अक्षय आणि कामगार नातेवाइकांकडे जात असताना आरोपींनी त्यांची दुचाकी अडवली. आरोपींनी नंदाबाई यांच्यासह त्यांच्या पतीच्या छातीवर लोखंडी गजाने वार केले, तर मुलाला दांडक्याने मारहाण केली. हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या नंदाबाई यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या घटनेनंतर नंदाबाई आव्हाड यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अशोक ज्ञानदेव आव्हाड, मुकेश अशोक आव्हाड, नागनाथ आव्हाड आणि रामदास हरिभाऊ आव्हाड यांच्याविरुद्ध मारहाण व धमकावल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# अल्पसंख्याकांच्या विकासासाठी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा

## अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान यांचे निर्देश

नगर – अल्पसंख्याक समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा प्रभावीपणे लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात यावा. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला विशेष प्राधान्य देऊन मदरसा शिक्षणाचे आधुनिकीकरण, उर्दू शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे तसेच विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान यांनी दिले.


अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान यांचे स्वागत करताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया.

जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, मनपा आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी तथा जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर, आयोगाचे सदस्य हुसेन शेख, अहमद देशमुख, शेख वसीम शेख अजिम, सदस्य सचिव मिनाज मुल्ला यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.

अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या विविध संधींची माहिती मिळावी यासाठी शासनाच्या योजनांची व्यापक जनजागृती करणे आवश्यक असल्याचे श्री. खान यांनी सांगितले. मदरसा शिक्षणामध्ये आधुनिक अभ्यासक्रमांचा समावेश करून विद्यार्थ्यांना विविध भाषा तसेच व्यावसायिक शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. मदरसा आधुनिकीकरण योजनेसाठी पात्र संस्थांनी आवश्यक प्रस्ताव तातडीने सादर करावेत, असेही त्यांनी निर्देशित केले.

उर्दू माध्यमाच्या शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. अल्पसंख्याक समाजासाठी उपलब्ध असलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदींचा योग्य व परिणामकारक वापर करून शासनाच्या योजनांचा लाभ गरजू व पात्र लाभार्थ्यांना मिळेल, याची दक्षता घ्यावी, असे श्री. खान यांनी नमूद केले.

परदेशात उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून आर्थिक मदत उपलब्ध करून दिली जात आहे. या योजनांची माहिती अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रभावी जनजागृती करावी. 'सबका साथ, सबका विकास' या भावनेतून अल्पसंख्याक समाजाशी संबंधित विविध प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी अहिल्यानगर जिल्ह्यात अल्पसंख्याक समाजासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती बैठकीत दिली. मदरसा आधुनिकीकरणासाठी पात्र संस्थांकडून प्रस्ताव लवकर प्राप्त करून घेण्यासाठी कार्यवाही सुरू आहे. उर्दू शिक्षणाच्या विकासासाठीही आवश्यक उपाययोजना करण्यात येत असून गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या माध्यमातून प्रोत्साहन दिले जात आहे. अल्पसंख्याकांची लोकसंख्या असलेल्या भागांमध्ये शैक्षणिक सुविधा व संधी वाढविणे, लसीकरण, पूरक पोषण आहार तसेच मदरसा आधुनिकीकरण यांसारखे उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी आणि मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी अल्पसंख्याक समाजाच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा बैठकीत सादर केला. यामध्ये स्वर्ण जयंती शहरी स्वयंरोजगार योजनेसह अन्य योजनांच्या अंमलबजावणीची माहिती देण्यात आली. बैठकीस विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी व संबंधित प्रतिनिधी उपस्थित होते.


नगर शहर व परिसरात गेले ३ महिने पावसाने दडी मारल्याने नगर जवळील पिंपळगाव तलावाने तळ गाठला आहे. या महिन्यात पाऊस पडला नाही तर दुष्काळ निर्माण होण्याची शक्यता आहे.

# माजी सैनिकांसाठी करार पध्दतीने कंत्राटी स्वरुपात अधीक्षक पदाची संधी

नगर – जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अहिल्यानगर यांच्या अधिपत्याखाली असलेल्या सैनिकी मुलांचे वसतिगृह, अहिल्यानगर व कोपरगाव येथे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात अशासकीय वसतिगृह अधीक्षक पदासाठी कंत्राटी स्वरूपात नियुक्ती करण्यात येणार आहे. उमेदवारांकडे मराठी, इंग्रजी टंकलेखनाचा व लेखा शाखेचे ज्ञान असणे आवश्यक असून, उमेदवार हे निवृत्त जेसीओ असणे आवश्यक आहे.

पात्र असलेल्या माजी सैनिकांकडून १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जासमवेत सैन्य सेवेतील डिस्चार्ज बुक, माजी सैनिक ओळखपत्र, मराठी, इंग्रजी टंकलेखन प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती जोडाव्यात. कामाचे ठिकाण अहिल्यानगर, कोपरगाव असेल. वसतिगृह अधीक्षक पद हे निवासी पद आहे. प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची नोंद घेण्यात येईल. विहित मुदतीत अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांना मुलाखतीस कळविण्यात येईल. इच्छुक माजी सैनिकांनी या संधीचा फायदा घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अहिल्यानगर यांनी केले आहे.

# बोल्हेगावातून ४५ वर्षीय व्यक्तीचे अज्ञात इसमाने केले अपहरण

नगर – शहरातील बोल्हेगाव परिसरातील गांधीनगर येथून एका ४५ वर्षीय व्यक्तीचे अज्ञात कारणासाठी अपहरण झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गांधीनगर, उभा मारुती परिसरातील रहिवासी विनोद रघुनाथ गायकवाड (वय ४०, व्यवसाय मजुरी) यांनी पोलिसांत तक्रार दिली आहे. तक्रारीनुसार, त्यांचे भाऊ प्रमोद रघुनाथ गायकवाड (वय ४५) हे ५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास बोल्हेगाव येथील उभा मारुतीजवळ उपस्थित होते. त्यावेळी कोण्या एका अज्ञात इसमाने त्यांना अज्ञात कारणासाठी त्यांच्या इच्छेविरुद्ध पळवून नेले.

कुटुंबीयांनी सर्वत्र शोध घेऊनही प्रमोद गायकवाड यांचा काहीच थांगपत्ता न लागल्याने, अखेर विनोद गायकवाड यांनी तोफखाना पोलीस ठाणे गाठून फिर्याद नोंदवली. पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १४०(३) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. प्रमोद गायकवाड यांचे वय ४५, उंची साडेपाच फूट, रंग काळा-सावळा, नाक बसके आणि मोठे, वाढलेले दाट केस तसेच चेहरा उभट आहे. त्यांच्या उजव्या हाताच्या दंडावर सिंहाचे चित्र गोंदलेले असून मानेवर पांढरे डाग आहेत. अंगात पिवळ्या रंगाचा शर्ट, काळ्या रंगाची पॅन्ट (ज्याला लाल रंगाची चिंधी बांधलेली आहे) आणि पायात निळ्या रंगाची स्लिपर चप्पल आहे. तोफखाना पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस अंमलदार प्रमिला गायकवाड या घटनेचा पुढील तपास करत आहेत. अशा वर्णनाची व्यक्ती आढळल्यास तत्काळ पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

# गाडी देण्यास नकार दिल्याने तरुणावर लाकडी दांडक्याने जीवघेणा हल्ला; चौघांवर गुन्हा दाखल

नगर – वाहनाची मागणी केली असता दुचाकी देण्यास नकार दिल्याच्या क्षुल्लक कारणावरून एका २४ वर्षीय तरुणाला लाकडी दांडक्याने बेदम मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना कानडे मळा भागात घडली आहे. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सावेडी परिसरातील डॉन बॉस्को कॉलनीत राहणारा प्रथम विजय साठे (वय २४) हा सोलापूर रस्त्यावरील कानडे मळा परिसरातून जात होता. त्यावेळी त्याच्या ओळखीचा मयूर मतकर याने प्रथम साठे याच्याकडे गाडीची मागणी केली. मात्र, प्रथमने गाडी देण्यास स्पष्ट नकार दिला. याचा प्रचंड राग मनात धरून आरोपी यश बुट्टे याने प्रथम याच्यावर लाकडी दांडक्याने जोरदार हल्ला चढवला.

त्यानंतर आरोपी मयूर मतकर, ताहीर शेख आणि त्यांच्यासोबत असलेल्या एका अनोळखी साथीदाराने प्रथमला खाली पाडून लाथाबुक्क्यांनी जबर मारहाण केली. आरोपींनी यावेळी प्रथमला अश्लील शिवीगाळ करत, 'तुझे हातपाय तोडून टाकीन' अशी उघड धमकी दिली आणि घटनास्थळावरून पळ काढला.

या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या प्रथम साठे याला तातडीने उपचारासाठी अहिल्यानगरच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. जखमी तरुणाच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी मयूर मतकर, यश बुट्टे, ताहीर शेख आणि एका अनोळखी व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा नोंदवला आहे. या घटनेचा पुढील तपास सहायक फौजदार डी. बी. पालवे करत आहेत.

## चंद्रकांत अंकम यांचे दु:खद निधन



नगर – तोफखाना, भराडगल्लीतील रहिवासी चंद्रकांत सुदर्शन अंकम (वय ३८) यांचे १० सप्टेंबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, वडील, भाऊ, भावजय, पत्नी, २ मुले असा परिवार आहे.

## वत्सलाबाई ठाणगे यांचे दु:खद निधन

नगर – बुरुडगाव रोड येथील रहिवासी वत्सलाबाई धोंडीबा



ठाणगे (वय ७८) याचे ९ सप्टेंबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, २ मुले, २ मुली, सुना, जावई असा परिवार आहे. सुनील व अनिल ठाणगे यांच्या त्या आई होत.

## भाऊसाहेब खामकर यांचे अल्प आजाराने निधन

पारनेर – पानोली सुपा, पारनेर येथील रहिवासी भाऊसाहेब



रामचंद्र खामकर (वय ५८) यांचे १० सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पानोली अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, ३ मुले, भाऊ, पुतण्या असा परिवार आहे. विष्णु फुलसौंदर यांचे मेहुणे तर माजी महापौर भगवान फुलसौंदर यांचे जावई होत.

## कुसुमबाई काकडे यांचे दु:खद निधन

शेवगाव – शेवगाव येथील रहिवासी श्रीमती कुसुमबाई विजय




काकडे (वय ७५) यांचे ९ सप्टेंबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शेवगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. स्व. विजय काकडे यांच्या पत्नी तर ॲड. अभिजित व युवराज काकडे यांच्या मातोश्री होत.

## भिकन कुमावत यांचे हृदयविकाराने निधन

श्रीरामपूर – कानिफनाथ रोड, मोरगे वस्ती येथील रहिवासी



भिकन काशिनाथ कुमावत (वय ७७) यांचे ९ सप्टेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, ३ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. डॉ. दत्ता कुमावत, डॉ. सौ. दिपा, प्रा. सौ. मनिषा, सीओ सुनीता यांचे ते वडील होत. डॉ. सौ. राजबाला दत्ता कुमावत यांचे ते सासरे होत.

# नेप्तीतील पाच गावठी हातभट्टी अड्ड्यांवर धडक कारवाई

## ४१० लिटर दारू आणि ६५०० लिटर कच्चे रसायन जागीच नष्ट

नगर – जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध व्यवसायांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी विविध अधिकारी व अंमलदारांचे पथक तयार करून अवैध धंद्यांचा शोध घेण्यासाठी रवाना केले होते. ९ सप्टेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नगर तालुका पोलीस स्टेशन हद्दीतील नेप्ती गावात गावठी हातभट्टी तयार करून विक्री करणाऱ्या ठिकाणांची माहिती काढून एकाच दिवशी ५ वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकले. या धडक कारवाईत पोलिसांनी ११ जणांविरुद्ध ५ गुन्हे दाखल केले असून, एकूण ३ लाख ६३ हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.


गावठी दारू अड्ड्यांवर छापे टाकून पकडलेल्या आरोपींच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

तसेच कारवाईदरम्यान ४१० लिटर गावठी हातभट्टीची दारू आणि ६५०० लिटर कच्चे रसायन जागीच नष्ट करण्यात आले आहे. नगर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत नेप्ती येथील अजय चांगदेव पवार, शशिकला चांगदेव पवार, सुनील बाजीराव पवार, राजू बाजीराव पवार, दीपक बबन नागपूरे, लहानुबाई छबु पवार, भारत माणिक पवार, मंगल भारत पवार, शरद माणिक पवार, ज्योती भरत पवार आणि कमल माणिक पवार या आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यापैकी काही जण फरार आहेत. या कारवाईत कच्च्या रसायनाचे व हातभट्टी दारूचे प्रमाण आणि किंमत लक्षात घेता अवैध व्यवसायिकांचे मोठे जाळे उद्ध्वस्त करण्यात आले आहे.

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे स.पो.नि. हरिष भोये, उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड व पोलीस अंमलदार संदिप पवार, बिरप्पा करमल, भिमराज खर्से, संतोष खैरे, शाहीद शेख, अतुल लोटके, अभिजीत अरकल, विजय ठोंबरे, विकास साळवे, अशोक लिपणे, शामसुंदर जाधव, अमोल आजबे, सतीष भवर, रोहित मिसाळ, प्रताप देवकाते, सुनिता पवार, सोनल भागवत, ज्योती शिंदे, भाग्यश्री भिटे, किरण ठुबे यांच्या पथकाने पार पाडली.

# शिक्षकांच्या प्रेरणा व ज्ञानातून विद्यार्थ्यांची स्वप्ने साकार

## अशोक गुर्जर यांचे प्रतिपादन; 'ब्रेड ऑफ लाईफ बोल फाउंडेशन'तर्फे भिंगारमधील शिक्षकांचा शाल, श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन गौरव


'ब्रेड ऑफ लाईफ बोल फाउंडेशन'तर्फे भिंगारमधील शिक्षकांचा शाल, श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन गौरव करण्यात आला.

नगर – शिक्षक हे केवळ विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान देणारे नसून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची, विचारांची आणि भविष्यातील वाटचालीची भक्कम पायाभरणी करणारे शिल्पकार आहेत. शिक्षकांच्या प्रेरणा, मार्गदर्शन आणि ज्ञानाच्या बळावर विद्यार्थ्यांची स्वप्ने साकार होतात. समाजाची सकारात्मक बांधणी करण्यामध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, प्रत्येक विद्यार्थ्याने शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेत आत्मविश्वासाने यशाची वाटचाल करावी, असे प्रतिपादन अहिल्यानगर येथील नामांकित चार्टर्ड अकाउंटंट अशोक गुर्जर यांनी केले.

'ब्रेड ऑफ लाईफ बोल फाउंडेशन'च्या वतीने शिक्षक गौरव दिनानिमित्त भिंगार येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर माध्यमिक विद्यालय, नूतन माध्यमिक विद्यालय, बालभवन व बालवाडी येथे कार्यरत असलेल्या मान्यवर गुरुजनांचा सन्मान करण्यात आला. अशोक गुर्जर व त्यांच्या पत्नी सौ. माधुरी गुर्जर यांच्या हस्ते शिक्षकांना शाल, श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या उपक्रमाला शिक्षक, विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अशोक गुर्जर होते. यावेळी सौ. माधुरी गुर्जर, फाउंडेशनच्या सचिव सौ. शोभा पाटोळे, अध्यक्ष जोसेफ पाटोळे, शाळेचे मुख्याध्यापक संजय शिंदे, शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला नमन करून झाली. त्यानंतर प्रमुख पाहुणे अशोक गुर्जर, सौ. माधुरी गुर्जर, फाउंडेशनच्या सचिव सौ. शोभा पाटोळे, मुख्याध्यापक संजय शिंदे आणि विद्यार्थी अर्पिता भिंगारदिवे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

प्रास्ताविक फाउंडेशनच्या सचिव सौ. शोभा पाटोळे यांनी केले.

फाउंडेशनचे अध्यक्ष जोसेफ पाटोळे यांनी स्वागत केले. यावेळी विद्यार्थी साई कोष्टी याने मनोगत व्यक्त करताना भावी यशाच्या वाटचालीत शिक्षकांचे मार्गदर्शन किती महत्त्वाचे आहे, याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

अशोक गुर्जर यांनी आपल्या मनोगतात शिक्षक हा समाजाच्या सकारात्मक बांधणीतील महत्त्वाचा घटक असल्याचे सांगितले. शिक्षक विद्यार्थ्यांच्या मनात आत्मविश्वास, शिस्त, संस्कार आणि ध्येय निर्माण करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षकांनी दिलेल्या मार्गदर्शनाचा योग्य उपयोग करून आपल्या जीवनात यश संपादन करावे, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेची भीती मनातून काढून टाकावी. सातत्याने प्रयत्न, सराव आणि आत्मविश्वासाच्या जोरावर कोणत्याही भाषेवर प्रभुत्व मिळविता येते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मुख्याध्यापक संजय शिंदे यांनी मनोगत व्यक्त करताना 'ब्रेड ऑफ लाईफ बोल फाउंडेशन'च्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. समाजातील विविध घटकांना मदतीचा हात देण्याबरोबरच शिक्षकांचा सन्मान करून त्यांच्या कार्याची दखल घेण्याचा फाउंडेशनचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षकांचा सन्मान हा प्रत्यक्षात शिक्षण क्षेत्राचा आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा सन्मान असल्याचेही त्यांनी नमूद केले.यावेळी शिक्षिका स्नेहल लवांडे यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.

सूत्रसंचालन क्रांती मोरे, अर्शीन सय्यद, जेनिफ शेख या विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रमाची सांगता फाउंडेशनचे स्वयंसेवक अनिकेत पाटोळे यांनी आभार मानून केली. फाउंडेशनच्या स्वयंसेविका सौ. अंकिता अनिकेत पाटोळे यांच्या हस्ते शिक्षक व विद्यार्थ्यांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

# करिअर ॲकॅडमी चालकाकडून विद्यार्थिनीचा विनयभंग

नगर – पोलीस भरतीचे प्रशिक्षण घेणाऱ्या एका २१ वर्षीय तरुणीचा अॅकॅडमी चालकाने विनयभंग केल्याची संतापजनक घटना अहिल्यानगरमध्ये घडली आहे. शिवरक्षक करिअर अॅकॅडमीचा चालक योद्धा राजे पवार याच्याविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

बीड जिल्ह्यातील बोरखेड येथील रहिवासी असलेली २१ वर्षीय विद्यार्थिनी अहिल्यानगरमधील शिवरक्षक करिअर अॅकॅडमीमध्ये पोलीस भरतीचे प्रशिक्षण घेत होती. ती याच संस्थेच्या वसतिगृहात वास्तव्यास होती.

दरम्यान, १७ जुलै ते ३ सप्टेंबर या कालावधीत संशयित आरोपी योद्धा राजे पवार याने तरुणीला कार्यालयात बोलावून तिच्याशी गैरवर्तन केले. हा प्रकार कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकीही आरोपीने दिली. याशिवाय तरुणी अनुसूचित जमाती प्रवर्गातील असल्याचे माहीत असतानाही, तिला जातीवाचक हीन बोलून अपमानित केले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

अहिल्यानगर महानगरपालिका
अहिल्यानगर

सार्वजनिक बांधकाम विभाग

''अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमियम रकमेतून''
सन २०२६-२७ अंतर्गत

जाहिर निविदा क्रमांक ०५ सन २०२६-२७
जाहिर निविदा सुचना क्रमांक ५/८ ते ५/९

''अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमियम रकमेतून'' सन २०२६-२७ अंतर्गत जाहीर निवीदा नोटीस क्र. ५/८ ते ५/९ निवीदा मागविणेसाठी अहिल्यानगर महानगरपालिकेच्या http://amc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तरी याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

जा. नं.प्रसिद्धी ३५५ शहर अभियंता
दि.१०/०९/२०२६ अहिल्यानगर महानगरपालिका

# गृहिणी

## आरोग्य

### झोपण्याची आधी...

झोप हा आपल्या शरीरासाठी अतिशय महत्वाचा भाग आहे. दिवसभर केलेल्या कामाचा थकवा झोपेमुळे दूर होतो. पण आज अनेक लोकांना झोप नीट लागत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे चुकीच्या सवयी. संध्याकाळ झाल्यावर आपले शरीर हळूहळू थंड होऊ लागते. त्यामुळे संध्याकाळी सात नंतर जड अन्न खाऊ नये. रात्रीचे जेवण नेहमी सूर्य मावळण्याच्या आत किंवा आठ वाजण्यापूर्वी करावे. जेवणात भाकरी, वरण, भाजी असावे. तेलकट आणि तिखट पदार्थ टाळावेत. जेवण झाल्यावर लगेच झोपू नये. थोडा वेळ शांत बसावे किंवा हळू हळू शंभर पावले चालावे. झोपण्यापूर्वी मन शांत असणे गरजेचे आहे. दिवसभरात घडलेल्या गोष्टींचा विचार झोपताना करू नये. झोपताना भांडण किंवा वाद करू नये. झोपण्याच्या खोलीत भडक उजेड असू नये. खोलीत मंद प्रकाश असावा. अंथरूण स्वच्छ असावे. उशी जास्त उंच असू नये. झोपताना नेहमी डाव्या कुशीवर झोपावे असे आयुर्वेदात सांगितले आहे. यामुळे पचन चांगले होते. रात्री झोपण्यापूर्वी पाय कोमट पाण्याने धुवावेत. यामुळे डोळ्यांना थंडावा मिळतो आणि झोप लवकर लागते. झोपण्यापूर्वी गायत्री मंत्र किंवा आपल्या देवाचे नामस्मरण करावे. याने मनातील भीती निघून जाते. रोज एकाच वेळेला झोपणे आणि एकाच वेळेला उठणे याने शरीराचे घड्याळ व्यवस्थित राहते. रात्री दहा वाजता झोपून पहाटे पाच वाजता उठणे ही सर्वात उत्तम सवय आहे. रात्री झोपण्यापूर्वी दिवसभराचा सर्व व्याप संपवावा. हात पाय स्वच्छ धुवावेत. दात घासावेत. हलके कोमट पाणी प्यावे. झोपण्याच्या खोलीतील सामान आवरून ठेवावे. अंथरूण झटकून घ्यावे. झोपण्यापूर्वी मोबाईल बाजूला ठेवावा. मोठ्याने बोलू नये. शांत बसून देवाचे नाव घ्यावे. दुसऱ्या दिवसाची तयारी करून ठेवावी म्हणजे सकाळी घाई होणार नाही. मनात चांगले विचार आणून झोपावे.

## पाककला

### गुळपापडी

**साहित्य :** कणीक २ वाटी, किसलेला गूळ १ १/२ वाटी, साजूक तूप १ वाटी, किसलेले सुके खोबरे १/२ वाटी, बारीक चिरलेला काजू २ चमचे, बारीक चिरलेला बदाम २ चमचे, वेलची पावडर १/२ चमचा, खसखस १ चमचा, डिंक २ चमचे

**कृती :** प्रथम कढई गरम करून त्यात अर्धी वाटी तूप टाका. तुपात डिंक तळून घ्या. तळलेला डिंक फोडून बाजूला ठेवा. त्याच कढईत उरलेले तूप टाकून त्यात कणीक घाला. मध्यम आचेवर कणीक खरपूस आणि सोनेरी रंग येईपर्यंत भाजून घ्या. कणीक भाजताना सतत हलवत रहा म्हणजे करपणार नाही. कणीक छान भाजल्यावर त्यात किसलेले खोबरे, खसखस, काजू, बदाम घालून दोन मिनिटे परतून घ्या. आता गॅस बंद करा. मिश्रण थोडे कोमट झाल्यावर त्यात किसलेला गूळ आणि वेलची पावडर घाला. तळलेला डिंक कुस्करून घाला. सर्व मिश्रण एकजीव करा. गुळाच्या उष्णतेने गूळ वितळेल आणि मिश्रण ओलसर होईल. एका ताटाला तूप लावून घ्या. तयार मिश्रण ताटात ओता आणि हाताने किंवा वाटीने दाबून एकसारखे थापून घ्या. वरून उरलेले काजू बदाम पसरवा. थोडे कोमट असतानाच सुरीने वड्या पाडा. पूर्ण थंड झाल्यावर वड्या काढा आणि हवाबंद डब्यात भरून ठेवा.

## वास्तू

### पादत्राणे (चपला) कुठे काढाव्यात? कोणती काळजी घ्यावी?

* चप्पल स्टँड नेहमी मुख्य दरवाजाच्या बाहेर, डाव्या बाजूला असावा. घरात शिरताना उजवा हात शुभ मानतात, त्यामुळे डावी बाजू चपलांसाठी योग्य आहे.

* वायव्य दिशा म्हणजेच उत्तर आणि पश्चिम यांच्या मधली जागा चप्पल स्टँडसाठी सर्वात चांगली आहे. दुसरा पर्याय म्हणजे पश्चिम दिशा.

## सौंदर्य

सकाळी उठल्यावर कोमट पाण्याने चेहरा धुवा. एक चमचा बेसन, चिमूटभर हळद आणि दही मिसळून लेप तयार करा. पाच मिनिटे चेहऱ्यावर लावून धुवा. याने चेहऱ्यावर निखार येईल.

## सल्ला

बिर्याणीसाठी पातेलं जाड बुडाचं घ्या. पातेल्याच्या तळाला सगळीकडे २ चमचे तूप लावून घ्या. तूप लावल्याने भात चिकटत नाही. **संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

**शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २०२६**

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, श्रावण कृष्णपक्ष. पूर्वा १३।१६, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आज दिवस धावपळीचा राहील. जुनी कामे पूर्ण होतील.

**वृषभ :** पैशाची आवक होईल. नातेवाईकांची भेट होईल.

**मिथुन :** कामात अडथळा येईल. खर्च वाढेल. मनात चंचलता राहील.

**कर्क :** मान सन्मान मिळेल. नवीन ओळखी होतील.

**सिंह :** व्यवसायात लाभ होईल. कुटुंबात आनंद राहील.

**कन्या :** दिवस संमिश्र राहील. दुपारनंतर कामे मार्गी लागतील.

**तूळ :** अचानक धनलाभ होईल. मनातील इच्छा पूर्ण होईल.

**वृश्चिक :** वादापासून दूर राहावे लागेल. कामाचा ताण जाणवेल.

**धनु :** भाग्याची साथ मिळेल. रखडलेले पैसे मिळतील.

**मकर :** कष्ट जास्त घ्यावे लागतील. कामात यश मिळेल.

**कुंभ :** नवीन संधी मिळतील. घरात शुभ कार्य घडेल. मन प्रसन्न राहील.

**मीन :** पैशाची चिंता राहील. जुने मित्र भेटतील. दिवस साधारण राहील.

## फिल्मीचक्कर क्र. १२५३ सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | | | | ■ |
| | ■ | | ■ | ■ | ■ | ■ | ३ |
| | ■ | ४ | ५ | | ६ | | ■ |
| | ■ | ७ | | ■ | | ■ | ८ |
| ■ | ९ | | ■ | १० | | ११ | |
| १२ | | | १३ | ■ | ■ | १४ | |
| ■ | | ■ | १५ | | १६ | ■ | |
| १७ | | | | ■ | १८ | | |

**आडवे शब्द :-** १) जितेंद्र, राज बब्बर, अनिता राज, गोविंदा यांचा एक चित्रपट ३) एक प्रसिद्ध दिवंगत दिग्दर्शक - सत्यजीत + ४) जॅकी श्रॉफ, मीनाक्षी शेषाद्री, शक्ती कपूर यांचा एक चित्रपट ७) दीवाने से ++ पूछो (गाण्याचे बोल) ९) ++ सावन (चित्रपटाचे नाव) १०) झूक गया ++++ (चित्रपटाचे नाव) १२) ये ++++ आँखे इन्हे देख कर जी रहे (गाणे) १४) ++ बलराम (चित्रपटाचे नाव) १५) +++ सजना ओ सजना तेरे प्यार मे (गाणे) १७) गायनातील एक राग १८) राजकुमार, माला सिन्हा, राजेश खन्ना यांचा एक चित्रपट

**उभे शब्द :-** १) शशी कपूर, हेमामालिनी, मदन पुरी यांचा एक चित्रपट २) राज बब्बर, दीपा साही, फारूक शेख, शाहरूखखान यांचा एक चित्रपट ५) आधा दिन आधी ++ (चित्रपटाचे नाव) ६) जितेंद्र, हेमामालिनी, प्रेम चोप्रा यांचा एक चित्रपट ८) नसिरुद्दीन शहा, रामेश्वरी, दीपक पाराशर यांचा एक चित्रपट ९) सुजॉय मुखर्जी, रामेश्वरी यांचा एक चित्रपट ११) गोरी तेरा गांव बडा प्यारा मैं तो गया ++ आ के यहां रे (गाणे) १३) +++ मंजील (चित्रपटाचे नाव) १६) मेरां ++ जोकर (चित्रपटाचे नाव)

# ✽ ✽ ✽ ✽ ✽ ✽ मुलांचे विश्व ✽ ✽ ✽ ✽ ✽ ✽

**सुविचार :** वेळ आणि प्रेम दोन्ही खूप मौल्यवान आहेत कारण वेळ कधीच सांगून येत नाही आणि प्रेम कधीच मागून मिळत नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### आपण मोठे कसे होतो? हाडे वाढतात की कातडी?

शरीराच्या वाढीची संपूर्ण गोष्ट आपण कधी विचार केलाय का, काल जो शर्ट अगदी बरोबर बसत होता तोच आज छोटा का होतो? आपण मोठे होतो म्हणजे नक्की आतमध्ये काय घडतं? ही गोष्ट फक्त हाडाची किंवा फक्त कातडीची नाही, तर ही एका सुंदर कारखान्याची गोष्ट आहे जो आपल्या शरीरात दिवस-रात्र चालू असतो. सगळ्यात आधी गोष्ट सुरु होते हाडांपासून. आपलं शरीर हे एका इमारतीसारखं आहे आणि हाडे म्हणजे त्या इमारतीचे खांब. लहान बाळ जेव्हा जन्माला येतं तेव्हा त्याची हाडे खूप मऊ आणि छोटी असतात. प्रत्येक लांब हाडाच्या वरच्या आणि खालच्या टोकावर एक विशेष जागा असते, डॉक्टर तिला ग्रोथ प्लेट म्हणतात. ही जागा म्हणजे हाडाचा कारखाना आहे. तिथे रोज लाखो नवीन पेशी तयार होतात. या पेशी हळूहळू एकमेकांवर रचल्या जातात आणि त्यांचं रूपांतर घट्ट हाडात होतं. अशा प्रकारे हाड हळूहळू लांब होत जातं आणि आपली उंची वाढते.

हा कारखाना लहानपणी खूप वेगात चालतो, म्हणून लहान मुलं पटकन वाढतात. पण वयाच्या अठरा-वीस वर्षांनंतर हा कारखाना बंद होतो, ग्रोथ प्लेटचं रूपांतर पूर्ण हाडात होतं आणि मग आपली उंची वाढणं थांबतं.

आता हाड तर वाढलं, पण त्याच्या वरची कातडी फाटत का नाही? हा प्रश्न खूप छान आहे. खरं तर कातडी पण त्याच वेळी वाढत असते. आपली कातडी ही एका रबरासारखी आहे जी ताणली जाऊ शकते. कातडीच्या आदी आतल्या थरात रोज नवीन कातडी तयार होत असते. वरची जुनी कातडी आपल्याला न दिसता हळूहळू गळून पडते. तुम्ही कधी उन्हातून आल्यावर कातडी निघालेली पाहिली असेल, तीच ही प्रक्रिया आहे. जेव्हा हाड लांब होतं, तेव्हा मेंदू कातडीला संदेश पाठवतो की आता तुला पण मोठं व्हावं लागेल. मग आतून नवीन कातडी जास्त प्रमाणात तयार होते आणि ती ताणली जाते. म्हणूनच आपण मोठे झालो तरी कातडी फाटत नाही.पण एवढंच नाही, या दोघांच्या मध्ये अजून एक महत्वाचा भाग आहे तो म्हणजे स्नायू आणि मांस.

हाडे ही फक्त काड्यासारखी उभी राहू शकत नाहीत, त्यांना ताकद देण्यासाठी त्यावर मांस चढावं लागतं. आपण जेव्हा खेळतो, पळतो, उड्या मारतो, तेव्हा हे स्नायू जाड आणि मजबूत होतात. आपण जे पोळी-भाजी, दूध, डाळ-भात खातो, त्याच्यापासून शरीरात रक्त तयार होतं. हेच रक्त सगळ्या शरीरात फिरून प्रत्येक हाडाला, प्रत्येक स्नायूला आणि कातडीला नवीन बनण्यासाठी लागणारं जेवण पोहोचवतं. जर चांगलं जेवण मिळालं नाही तर हा कारखाना मंदावतो आणि वाढ नीट होत नाही.म्हणून शेवटी उत्तर असं आहे की मोठं होताना फक्त हाडे नाहीत आणि फक्त कातडी नाही, तर सगळं शरीर एकत्र वाढतं.

आधी हाडे लांब होतात, मग त्यावर स्नायूंची ताकद येते आणि मग कातडी त्या सगळ्यावर मोठी होते. हाडे, मांस आणि कातडी हे तिघे मिळून आपल्याला मोठं बनवतात, आणि या तिघांना मदत करतं ते आपलं जेवण, खेळ आणि गाढ झोप.

### मोबाईल मध्ये हरवलेला चिंटू


चिंटू नावाचा एक हुशार मुलगा होता. तो पाचवीत शिकत होता. एकदा त्याच्या वाढदिवसाला बाबांनी त्याला नवीन मोबाईल घेऊन दिला. पहिले दोन दिवस त्याने फक्त अभ्यासासाठी मोबाईल वापरला, पण हळूहळू त्याला गेमचे व्यसन लागले. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत चिंटू मोबाईलमध्येच असायचा. आई जेवायला बोलावली तरी तो म्हणायचा, एक गेम राहिला. बाबा अभ्यास करायला सांगायचे तर तो म्हणायचा, होमवर्क झाल्यावर खेळतो. मित्र मैदानावर खेळायला बोलवायला आले तरी तो घरातून बाहेर येईना.

त्याचे डोळे लाल झाले, अभ्यासात लक्ष लागेना आणि डोके सारखं दुखू लागलं. एक रात्री विचित्र गोष्ट घडली. चिंटू गेम खेळत असताना मोबाईलच्या स्क्रीनमधून एक प्रकाश आला आणि चिंटू खरंच मोबाईलच्या आत ओढला गेला. आत सगळीकडे फक्त गेम, कार्टून आणि व्हिडीओ होते. सुरुवातीला त्याला खूप मजा वाटली. पण थोड्या वेळाने त्याला भूक लागली. तिथे खायला काहीच नव्हतं. त्याला आईची हाक ऐकू आली, पण तो बाहेर येऊ शकत नव्हता. मैदानावर मित्र खेळत होते, त्यांचा आवाज येत होता, पण तो त्यांच्यासोबत खेळू शकत नव्हता. त्याला खूप रडू आलं.

तेवढ्यात त्याची आईने त्याला हलवून उठवलं. तो घामाघूम झाला होता. ते एक स्वप्न होतं. पण त्या स्वप्नाने त्याचे डोळे उघडले. त्याने मोबाईल बाजूला ठेवला आणि धावत जाऊन आईला मिठी मारली. दुसऱ्या दिवसापासून त्याने ठरवलं, मोबाईल दिवसातून फक्त एक तास, बाकी वेळ अभ्यास, खेळ आणि मित्रांसाठी. आता चिंटू पुन्हा पहिल्यासारखा हसरा आणि हुशार झाला.

**बोध :** मोबाईल हे ज्ञानासाठी साधन आहे, आयुष्य नाही. त्याच्या आहारी गेलो तर आपण खऱ्या आनंदाला मुकतो.

## आत्मशक्ति



### भवसागरात वाहत जाणे

काय एका संकटानंतर दुसऱ्या व नंतर तिसऱ्या संकटाशी झुंज देत देत आम्ही ह्या संसार सागरात वाहत जात आहोत ? तर मग आम्ही आमच्या आयुष्याचे ध्येय कसे गाठू शकू ?जेव्हा आम्ही आमच्या आत्म्याकडे लक्ष देत नाही आणि वेळ वाया जात असतो, तेव्हा मनुष्य जीवनाचे आमचे उच्चतम ध्येय अपूर्ण राहण्याचा धोका असतो. पुष्कळदा आम्ही आमच्या कामात एवढे मग्न असतो की, आमचे जीवन, आमचे लक्ष्य आणि आमच्या प्रथम प्राधान्याच्या गोष्टींकडे लक्ष द्यावयास आम्हाला फुरसतच मिळत नाही.

पुष्कळदा आम्हाला पटते की आमचे आयुष्य आमच्या हाती नाहीच! आमचा दैनंदिन कार्यक्रम एकतर आमच्या मालकाच्या हातात असतो किंवा कुटुंबियांच्या हातात असतो.

आम्ही किती दिवस काम केले पाहिजे, आम्ही कोणती सुट्टी घ्यावयास हवी हा गोष्टींचा निर्णय आमचा व्यवसाय घेतो किंवा आम्हाला किती पैसे कमवावयाचे आहेत हा उद्देश ते ठरवतो. शरीराच्या गरजाही आम्हाला विचार करावयास लावतात. शरीर जतन करावयाचे तर त्यासाठी जेवण पाहिजे आणि जेवण उपलब्ध करावयाचे तर त्यासाठी आम्ही कम ई करावयास हवी. आमच्या जीवनभरच्या गरजा भागविण्यासाठी आम्हाला पैशांची गरज पडते. जेव्हा आम्ही आजारी पडतो, तेव्हा उपचारार्थ वेळ जातो. जर आम्हाला मुलेबाळे असली तर त्यांचे शिक्षण, खेळ आणि त्यांच्या शारीरिक व संगोपनात्मक गरजांसाठीही वेळ काढावा लागतो. यावरून असे स्पष्ट दिसू लागते की, एकांतात बसून आमच्या जीवनाबद्दल विचार करावयास आमच्याजवळ एक क्षणसुद्धा उरत नाही.

आम्ही आपला वेळ कसा घालवितो ?कित्येक संशोधनानंतर आम्ही आमच्या जीवनात वेगवेगळ्या कामांसाठी किती वेळ घालवितो हे स्पष्ट झाले आहे. हे निर्णय आश्चर्यकारक आहेत. समजा की आमचे आयुष्य ७० वर्षांचे आहे. तेव्हा या आयुष्यात आम्ही खालीलप्रमाणे वेळ खर्च करतो.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### टीका करू नका, सबल बनवा

सुरेश ओबेरॉय : आदर हा मानवी नात्यांचा पाया आहे. आजकाल, तुलना आणि टीका करणं एवढं वाढलं आहे की आदराला जागाच उरलेली नाही. इतरांच्या चुका दुरुस्त करताना आपण खूप असभ्य होतो आणि छोट्या छोट्या गोष्टी उगाच वाढवतो.

शिवानीदीदी : इतरांना आपली प्रतिक्रिया दिलीच पाहिजे आणि मतंही मांडलीच पाहिजेत पण त्यांच्यावर टीका करणं संपूर्णतः वेगळं आहे.

सुरेश ओबेरॉय : आपण इतरांना म्हणतो, तुम्ही नेहमी असंच करता.

शिवानीदीदी : जेव्हा आपण म्हणतो, तुम्ही नेहमी हेच करता, ही काही पहिली वेळ नाही. तेव्हा आपण त्या कृतीपेक्षा, त्या कृतीत गुंतलेल्या व्यक्तीवर हल्ला करतो. एखाद्याने चूक केली तरीही- उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीने वस्तू खाली पाडली आणि ती तोडली, तर आपली प्रतिक्रिया कशाबाबत असायला हवी ?

सुरेश ओबेरॉय : हा खूप चांगला मुद्दा आहे - आपण कृतीवर हल्ला करत नाही पण त्या व्यक्तीच्या स्वाभिमानावर करतो.

शिवानीदीदी : बरोबर. म्हणजे जर ती चूक मी केली असेन आणि तुम्ही अधिकारी पदावर असाल, तर तू ते नीट पकडलं नाहीस, असं तुम्ही मला सांगायला हवं. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे, पुढच्या वेळेस ते काम कसं नीट करायचं म्हणजे मी ते पुन्हा पाडणार नाही, हे सांगायला हवं. एक मित्र, पालक किंवा अधिकारी व्यक्ती म्हणून मला प्रतिक्रिया देणं हे तुमचं काम आहे. असं असलं तरीही, प्रतिक्रियेत टीकेची सरमिसळ असता कामा नये. दोन्ही प्रकारच्या प्रतिक्रियांमध्ये खूप फरक आहे. टीकेची भाषा, 'मी तुला किती वेळा हे शिकवलं आहे पण तू शिकशील तर ना' किंवा 'तू नेहमी असंच करतोस', अशी आहे.

सुरेश ओबेरॉय : हे काम तू गेली अनेक वर्ष करत आहेस पण तरी काही शिकला नाहीस, असंही आपण म्हणतो.

शिवानीदीदी : समजा तुम्ही चिडलेले आहात आणि माझ्यावर टीका करत आहात. हा प्रसंग बघणाऱ्याला माझ्याबद्दल वाईट वाटेल कारण त्याला वाटेल की माझ्यावर अन्याय होत आहे. तुमच्याकडून नकारात्मक ऊर्जा आणि कटू शब्द मिळाल्यानंतर, मी दुःख निर्माण करेन. पण जर तुम्ही दोन्ही बाजूंची तुलना केली - एक, ज्याच्यावर टीका होत आहे आणि दुसरी, जो टीका करतो आहे - तर दोन्हींमध्ये जास्त नुकसान कोणाचं आहे?

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

पप्पू सलून मध्ये गेला.
कारागीर : साहेब, केस कसे कापू?
पप्पू : फुकट!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* दारू पिऊन गाडी चालवणे कोणत्या कलमात गुन्हा आहे?
– मोटार वाहन कायदा कलम १८५

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

७) तुरीच्या डाळीला चिंच, आमसूल, गूळ, लाल मिरची व गरम मसाला घालून सांबार बनविले असता ते रुचकर व चविष्ट होते.सावधानता :अशा अनेक प्रकारे आपण तूर किंवा तुरीची डाळ आहारात वापरू शकतो. फक्त ही डाळ पित्तकर असल्याने हिच्यापेक्षा मुगाची डाळ श्रेष्ठ असते, असे आयुर्वेदात सांगितले आहे. ही डाळ पित्तकर असल्याने तिचा पित्तकर गुण कमी करण्यासाठी वरणाला किंवा आमटीला गायीच्या तुपाची फोडणी द्यावी, याने पित्तशमन होते. तसेच पित्तप्रकृतीच्या व आम्लपित्ताची तक्रार असणाऱ्या व्यक्तींनी ही डाळ खाऊ नये. उन्हाळ्यामध्ये सुद्धा हिचा वापर करणे टाळावे.

-----------------

### लवंग

फार प्राचीन काळापासून आहारशास्त्राबरोबरच आयुर्वेदशास्त्रादेखील लवंगेचा वापर केला जातो. अनेकजण घरगुती औषध म्हणूनही तिचा वापर करतात. मसाल्यामध्ये सुगंध आणण्यासाठी लवंगेचा वापर केला जातो. मराठीमध्ये 'लवंग', हिंदीमध्ये 'लौंग', संस्कृतमध्ये 'देवकुसुम', तर शास्त्रीय भाषेत या नावाने ओळखली जाणारी लवंग 'मिरटेसी' या कुळातील आहे. लवंगेचे झाड पंचवीस ते तीस फूट उंच व वर्षभर हिरवेगार असते. या झाडावर तीन-तीन गुच्छांचा समूह तयार होतो. या गुच्छांना कळ्या लागतात. या कळ्या फुलून लहान फुले होतात. या फुलांनाच आपण 'लवंग' असे म्हणतो. जेथे पाऊस खूप पडतो, तेथे लवंगेचे झाड दिसून येते. जगामध्ये सिंगापूर व पूर्व आफ्रिकेत ही झाडे भरपूर प्रमाणात आहेत. मलाक्का, झांजिबार व त्याच्याजवळ असणाऱ्या पेम्बा टापूमध्ये लवंगेची झाडे अधिक प्रमाणात आहेत. भारतामध्येही लवंगेची झाडे आढळतात. परंतु त्याचे प्रमाण खूप कमी आहे. लवंगेचे दोन प्रकार आहेत. एक तीव्र सुगंधाची काळी लवंग व दुसरी फुरकट रंगाची लवंग होय. जी लवंग उग्र वासाची, तिखट आणि दाबल्यानंतर तिच्यामध्ये तेलाचा अंश असल्याचे जाणवते, ती उत्तम प्रतीची असते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# ‘आयएमएस’मध्ये बीबीए व बीसीए विद्यार्थ्यांसाठी ‘जेनेसिस २०२६’ इंडक्शन कार्यक्रम उत्साहात

नगर – बी.पी. हिवाळे एज्युकेशन सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, करिअर डेव्हलपमेंट अँड रिसर्च (आय एम एस ) येथे नव्याने प्रवेश घेतलेल्या बीबीए व बीसीए प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ‘जेनेसिस’ या इंडक्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. २ ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेला हा तीन दिवसीय कार्यक्रम विविध मार्गदर्शनपर सत्रे, तज्ज्ञांचे व्याख्यान, व्यवस्थापनविषयक उपक्रम व स्वागत समारंभामुळे उत्साहात पार पडला.



आय एम एस येथे नव्याने प्रवेश घेतलेल्या बीबीए व बीसीए प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ‘जेनेसिस’ या इंडक्शन कार्यक्रम प्रसंगी उपस्थित विद्यार्थी व

कार्यक्रमाची सुरुवात इन–चार्ज डायरेक्टर डॉ. प्रणोती तेलोरे यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यांनी विद्यार्थ्यांचे आयएमएस परिवारात स्वागत करून महाविद्यालयीन जीवनातील शैक्षणिक शिस्त, जबाबदारी आणि उपलब्ध संधींचा सकारात्मक उपयोग करण्याचे आवाहन केले. संस्थेचे चे सेक्रेटरी श्री. विशाल बार्नबस यांनी बीबीए व बीसीए विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत संस्थेच्या शैक्षणिक वातावरणाचा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा दृष्टिकोन स्पष्ट केला. ॲडव्हायझर डॉ. एम. बी. मेहता यांनी संस्थेची परंपरा, मूल्ये आणि वाटचाल विद्यार्थ्यांसमोर मांडली. डेप्युटी डायरेक्टर डॉ. विक्रम बार्नबस यांनी विद्यार्थ्यांना संस्थेच्या नियम व आचारसंहितेबाबत मार्गदर्शन केले. या औपचारिक सत्रात डॉ. सय्यद मुदस्सर यांनी बीसीए अभ्यासक्रमाशी संबंधित मार्गदर्शन केले, तर डॉ. हर्षवर्धन भावसार यांनी बीबीए अभ्यासक्रम व विद्यार्थ्यांसाठी असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

कार्यक्रमादरम्यान प्लेसमेंट विभागाचे प्रो. सुरेश खन्ना यांनी विद्यार्थ्यांना प्लेसमेंट व करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. तसेच डॉ. स्वाती बार्नबस यांनी ग्रंथालयातील डिजिटल व भौतिक साधने, ई–रिसोर्सेस आणि विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या अभ्याससुविधांची माहिती दिली. श्री. सी. डी. मोहिटे यांनी प्रशासकीय विभागाच्या कार्यपद्धतीची माहिती दिली, तर सुश्री मुजावर शाफिया व सुश्री शेख खुदेजा यांनी विविध उपक्रम व सुविधा विद्यार्थ्यांना समजावून सांगितल्या.

पहिल्या दिवशी कोहिनूर ग्रुप चे मालक अश्विन गांधी यांचे विशेष मार्गदर्शनपर सत्र आयोजित करण्यात आले. दुसऱ्या दिवशी डॉ. भारती यांनी प्रभावी सत्र घेतले. विद्यार्थ्यांनी आपल्या विचार, भावना, कृती आणि कार्यक्षम तेमध्ये योग्य समतोल राखणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मोबाईल व सोशल मीडियामुळे होणारे लक्ष विचलन, भावनांचे व्यवस्थापन आणि स्वतःवर नियंत्रण ठेवणे यावर त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विचार, भावना आणि कृती यांचा परस्परसंबंध समजावून सांगत विद्यार्थ्यांनी प्रतिक्रिया देण्याआधी थांबून परिस्थितीकडे सजगपणे पाहण्याचा संदेश त्यांनी दिला.

यानंतर डॉ. मंगेश वाघमारे यांचे विशेष मार्गदर्शनपर सत्र झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व्यवस्थापनाची मूलभूत तत्त्वे आणि व्यवस्थापनाचा अभ्यासक्रम तसेच भविष्यातील शैक्षणिक व व्यावसायिक जीवनातील उपयोग याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना दिशा दिली. विद्यार्थ्यांनी व्यवस्थापनाकडे केवळ अभ्यासाचा विषय म्हणून न पाहता दैनंदिन जीवन, निर्णयप्रक्रिया आणि भविष्यातील करिअरमध्ये त्याचा उपयोग कसा करता येईल, यावर त्यांनी भर दिला. इंडक्शन कार्यक्रमाच्या तिसऱ्या दिवशी रेडीओ सीटी चे आर जे प्रसन्न यांच्या उपस्थितीत जेनेसिस वेलकम पार्टीचे चे आयोजन करण्यात आले. त्यांच्या उत्साहपूर्ण सादरीकरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंद, ऊर्जा आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या कार्यक्रमाने तीन दिवसीय इंडक्शन कार्यक्रमाची सांगता संस्मरणीय पद्धतीने झाली.

‘‘जेनेसिस २०२६’ हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना संस्थेची ओळख करून देण्याबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला, करिअर नियोजनाला, व्यवस्थापन कौशल्यांना आणि सकारात्मक विचारसरणीला चालना देणारा ठरला. तज्ज्ञांचे मार्गदर्शन, प्रेरणादायी सत्रे आणि विविध विभागांच्या परिचयामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या महाविद्यालयीन प्रवासाची व्यापक दिशा मिळाली. त्यामुळे ‘जेनेसिस २०२६’ हा बीबीए व बीसीए विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाची प्रेरणादायी सुरुवात ठरली.

# प्रेरणादायी अक्षरधन

## निष्क्रियता हेच दास्य

संकलन: दिशान फिचर्स




माणूस एक मजेदार प्राणी आहे. तो दास कुणाला म्हणतो? जो त्रास घेवून दुसऱ्यासाठी प्रयत्न करतो त्याला नोकर कुणाला म्हणतो? जो सकाळपासून सारखा काम करीत असतो त्याला.

चाक कुणाला म्हणतो? जो मुळीही चालढकल न करता सारखा दुसऱ्याच्या सुखासाठी खपत असतो त्याला. कधी मानाने वागविले जात नाही. जिव्हाळ्याने हाक मारली जात नाही अशांना. खरे तर हारतुरे देउन अशांचे स्वागत करायचे. दुसऱ्यासाठी राबण्यात रंगणाऱ्याला नोकर. हलका ठरविणे चूक आहे.

जो मुळीही काम करीत नाही. तो दास तो बसतो गादीवर उदास. त्याला एकच ध्यास, दुसऱ्याच्या गळ्याला कसा लावू फास त्याचा समाजाला नुसता त्रास, माणुसकीला काळे फासण्यात मात्र त्याला उल्हास. त्याची निष्ठा फक्त दुसऱ्याला फसविण्यावर. तेच म्हणायचे दास होउ दे त्याचा नाश. पण कठीण आहे ते त्याच्याजवळ आहे पैशाची रास आणि शस्त्रास्त्रे तेव्हा त्यांच्या शस्त्रावर करावी मात. हे इंद्रा होउ देत या दासांचा –हास.

तेव्हा निष्क्रिय मालक हाच नोकर मालकालाही आहेत हात पाय, त्याचा उपयोग काय? आमचा देवसुद्धा निष्क्रिय नाही. भक्त म्हणतो, मी तुझा दास, पण देव म्हणतो मी तर दासानुदास, पाहा देव कसा घेतो त्रास. संत जनाबाई म्हणतात

झाडलोट करी जनी केरभरी चक्रपाणी।
पाटी घेउनिया डोईवरी
नेउनिया टाकी दुरी ।।

विठ्ठल दिसतो नुसता विटेवरी उभा, कटीवर हात, पण ती न खरी बात. घाम फुटेपर्यंत देव राहतो कामात. संत जनाबाई म्हणतात.

साळी कांडायास काढी।
चक्रपाणी उखळ झाडी ।।
कांडिताना घाम आला। नेणे पितांबर भिजला ।। हाता आला असे फोड।
जनी म्हणे मुसळ सोड।।

कामाची लाज नसावी. स्वतःचे काम स्वतः करण्याची तर मुळीच नसावी. कामातल्या माणसाचे हातपाय हलतात. जो जिवंत असल्याची साक्ष देतात. हलणाऱ्या हातांची रुपे देवांनादेखील घडवतात. हात कमरेवर असले तर विठोबा. बासरीवर फिरले तर कृष्ण आणि धनुष्यात गुंतले तर राम.

बरे, नोकरांची सवय असली, तर कसेही चालवून घ्यावे लागते. मग असे देले तरी चाचेल तसे केले तरी चाचेल, पण असेतसे केले तर? मग मात्र कपाळावर आठी चढेल, पण सगळे शांतपणे सहन करावे लागेल. मग नोकराच्या तालावर चालणारे तुम्ही, तुम्हाला मालक कोण म्हणेल? उलट ऋग्वेद म्हणतो तसे तुम्हालाच जग दास म्हणून गणेल गुलाम म्हणेल.

ईशावास्योपनिषद म्हणते, शंभर वर्षे जगायचे ना ? मग काम करा. स्वत: स्वतःचे मालक व्हा निष्क्रियता हेच दास्य.

**– किशोर गांधी**

# सभासदांसाठी १५ लाखांचा अपघात विमा आणि अल्प दरात कर्ज पुरवठा

## रेव्हेन्यू सोसायटीची १०५ वी वार्षिक साधारण सभा उत्साहात संपन्न

नगर – रेव्हेन्यू अँड रजिस्ट्रेशन डिपार्टमेंट्स गव्हर्नमेंट सर्व्हंट्स को–ऑप. क्रेडिट सोसायटी लि. अहिल्यानगर या संस्थेची सन २०२५–२६ ची १०५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच नवीन जिल्हाधिकारी कार्यालयातील नेहरू सभागृहात उत्साहात पार पडली. निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते हे या सभेच्या अध्यक्षस्थानी होते.

सभेची सुरुवात संस्थेचे सभासद गणेश नरोटे यांच्या मुली श्रावणी व श्रेयशी नरोटे यांच्या स्वागतगीताने झाली. या प्रसंगी संस्थेचे चेअरमन प्रवीण बोरुडे यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. संस्था सभासदांना मासिक पगारानुसार ४० लाख रुपयांपर्यंत ८.२५ % या अल्प दराने त्वरित कर्ज वाटप करत असून सभासदांच्या वर्गणी ठेवीवर ८ % दराने व्याज दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच यंदा संस्थेच्या खेळत्या भांडवलात भरीव वाढ झाली असून सभासदांचा प्रत्येकी १५ लाख रुपयांचा अपघात विमा उतरविल्याचे त्यांनी नमूद केले.



रेव्हेन्यू सोसायटीच्या १०५ व्या वार्षिक साधारण सभेत सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात आला. (छाया – बबलू शेख)

अध्यक्षीय भाषणात बोलताना निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांनी संस्थेचा कारभार पारदर्शक असल्याचे सांगत राबवल्या जाणाऱ्या योजनांचे कौतुक केले. कार्यकारी मंडळ सभासदांचे हित लक्षात घेऊन संस्थेचा प्रगती आलेख उंचावत असून संस्थेत थकबाकी नसल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी दादासाहेब गिते यांच्या शुभहस्ते सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा ट्रॉफी व बक्षीस देऊन तसेच सेवानिवृत्त सभासदांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी संघटनांचे पदाधिकारी संतोष तनपुरे, अक्षय फलके, गणेश जाधव, डॉ. मुकुंद शिंदे, रवि डिक्रुज, राजेंद्र आंधळे, संजय डोके, अशोक मासाळ, सुरेश राऊत, शुभम गुंजाळ व प्रसन्ना पाठक यांचाही सन्मान करण्यात आला.

सभेत विषय पत्रिकेवरील सर्व विषय सर्वानुमते मंजूर करण्यात आले. सभेचे सूत्रसंचालन प्रसन्ना पाठक यांनी केले, तर चेअरमन व व्हा. चेअरमन यांनी सर्व सभासदांचे आभार मानले. ही सभा अत्यंत खेळमेळीच्या वातावरणात पार पडली.

या सभेस व्हा. चेअरमन प्रदिप चव्हाण, संचालक संदिप तरटे, संतोष मांडगे, सुरेश राऊत, राजेश घोरपडे, बाबासाहेब दातखिळे, गणेश गर्कळ, हरिभाऊ सानप, विजय हरिश्चंद्रे, प्रदिप अवचर, वृषाली करोसिया, सुनंदा मरकड, सनी जाधव, विकास मोराळे, डॉ. मुकुंद शिंदे व जनरल सेक्रेटरी बाबासाहेब पालवे यांच्यासह सर्व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलची मुंबईत बैठक

## अहिल्यानगर पदाधिकाऱ्यांचा सहभाग

नगर – राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ओबीसी सेलची महत्त्वपूर्ण बैठक मुंबई येथे उत्साहात पार पडली. अहिल्यानगर शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांच्या सूचनेनुसार आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत ओबीसी सेलच्या संघटनात्मक वाटचालीसह विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.




राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलच्या मुंबईत झालेल्या बैठकीत अहिल्यानगर ओबीसी सेलतर्फे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्याची भेट देऊन सन्मान करण्यात आला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे तसेच ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. यावेळी ओबीसी समाजाशी संबंधित विविध प्रश्न, पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना, आगामी काळातील संघटनात्मक कार्यक्रम तसेच ओबीसी सेलची प्रभावीपणे बांधणी करण्याबाबत विचारविनिमय करण्यात आला.

या बैठकीस अहिल्यानगर ओबीसी सेलचे शहर जिल्हाध्यक्ष दीपक खेडकर, शहर जिल्हा कार्याध्यक्ष नितीन घोडके, शहर जिल्हा उपाध्यक्ष किरण जावळे, महेश सुडके आदी पदाधिकारी उपस्थित होते. अहिल्यानगर शहरातील ओबीसी सेलच्या संघटनात्मक कामकाजाचा तसेच आगामी काळातील उपक्रमांचा यावेळी आढावा घेण्यात आला.

दरम्यान, अहिल्यानगर ओबीसी सेलच्या वतीने प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे यांचा क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्याची भेट देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी आमदार जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्यानगर शहरातील ओबीसी सेलच्या पुढील वाटचालीसंदर्भात प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे यांच्यासोबत सविस्तर चर्चा करण्यात आली. पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविण्यासोबतच ओबीसी समाजातील नागरिकांशी अधिक प्रभावीपणे संपर्क वाढविणे, संघटनेत नवीन कार्यकर्त्यांना संधी देणे आणि पक्षसंघटना अधिक सक्षम करण्याबाबत विविध मुद्द्यांवर चर्चा झाली.

ओबीसी समाजाच्या प्रश्नांसाठी संघटितपणे काम करत पक्षसंघटना अधिक मजबूत करण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.



विजय शंकर महादेव मंदिरात श्रावण महाप्रसादचे वाटप करण्यात आले.

# विजय शंकर महादेव मंदिरात श्रावण महाप्रसादचे वाटप

नगर – पोस्ट ऑफिससमोर असलेल्या श्री विजय शंकर महादेव मंदिर येथे ९ सप्टेंबर रोजी भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत हा भंडारा आयोजित करण्यात आला होता.

श्रावण मासानिमित्त मंदिरात आकर्षक विद्युत रोषणाई व फुलांची सजावट, प्रवेशद्वारावर आकर्षक रांगोळी, भजन गायन व लघु रुद्राभिषेक, महा अभिषेक आणि महाआरती झाली. पुजारी राजेंद्र राजमाने यांनी महा अभिषेक केला.

अहिल्यानगर, माळीवाडा, नालेगाव, कापड बाजार, भिंगार, केडगाव सावेडी परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतला.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अहिल्यानगर शहर महिला आघाडीची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

# राष्ट्रवादीच्या महिला आघाडीला नवी ऊर्जा; शहर कार्यकारिणीमध्ये नव्या नियुक्त्या

## महिलांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासह बूथस्तरावर संघटन मजबूत करण्याचा निर्धार

नगर – राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अहिल्यानगर शहर महिला आघाडीची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने शहर महिला अध्यक्ष अर्चना गायकवाड यांनी प्रदेश अध्यक्षा रोहिणीताई खडसे यांच्या मान्यतेने विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या.

खासदार निलेश लंके, जिल्हाध्यक्ष सीताराम काकडे, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष अथर खान, कार्याध्यक्ष समीर पठाण, नगरसेवक योगीराज गाडे, जिल्हा उपाध्यक्ष मतीन शेख, गारुडकर सर, रामभाऊ वाणी, सरपंच शरद पवार, रामभाऊ झीने, शहर कार्याध्यक्ष अजहर शेख, असिर शेख आदींच्या उपस्थितीत नियुक्तीपत्रे देण्यात आले.

अहिल्यानगर शहर जिल्हा उपाध्यक्षपदी वेणूबाई विठ्ठल वाणी, महासचिवपदी वर्षा सांतवन सगलगिरे, शहर सचिवपदी ज्योती भोसले व अलका वाकडे, तर सहसचिवपदी अर्चना दत्तू शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली. महिलांना राजकीय, सामाजिक व संघटनात्मक क्षेत्रात अधिकाधिक संधी देण्याच्या पक्षाच्या भूमिकेनुसार या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर पक्षाची विचारधारा जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासह महिलांच्या विविध प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. महिला शक्तीला संघटित करून पक्षाची ताकद बूथस्तरापर्यंत वाढविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

‘महिला सशक्तीकरण, संघटन बळकटीकरण आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी संघर्ष’ या भूमिकेतून आगामी काळात महिला आघाडीच्या माध्यमातून विविध सामाजिक व संघटनात्मक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या नियुक्त्यांमुळे पक्षाच्या महिला संघटनेला नवी ऊर्जा मिळून संघटन अधिक गतिमान होईल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते स्वप्नील खामकर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

## भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान आणि मानवतेचा व्यापक वेध घेणारे ‘भारत : द इटर्नल’ प्रकाशित

नगर – भारतीय संस्कृती, विचारपरंपरा, तत्त्वज्ञान आणि मानवतेच्या सार्वत्रिक दृष्टिकोनाचा व्यापक वेध घेणारे युवा साहित्यिक तथा उद्योजक स्वप्नील खामकर यांच्या ‘भारत : द इटर्नल’ या सहाव्या पुस्तकाचे प्रकाशन रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती होती.



आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते स्वप्नील खामकर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

या पुस्तकाच्या माध्यमातून भारताकडे केवळ भौगोलिक राष्ट्र किंवा प्राचीन संस्कृती म्हणून न पाहता, हजारो वर्षांची वैचारिक, आध्यात्मिक आणि मानवी परंपरा असलेली चिरंतन सभ्यता म्हणून पाहण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. भारतीय विचारांमधील मानवतावाद, सार्वत्रिकता, अहिंसा, वेदान्ताचा व्यापक दृष्टिकोन, जागतिक शांतता आणि मानवएकतेची संकल्पना यांचा पुस्तकात अभ्यासपूर्ण वेध घेण्यात आला आहे. भारताच्या ज्ञानपरंपरेने जगाला दिलेल्या विचारांचा आधुनिक जगाशी असलेला संबंध, भारतीय तत्त्वज्ञानातील मानवकेंद्री दृष्टिकोन तसेच भविष्यातील जागतिक समाजासाठी भारतीय विचारांचे महत्त्व यावरही पुस्तकातून प्रकाश टाकण्यात आला आहे.

आनंदराज आंबेडकर म्हणाले की, अत्यंत कमी वयात एवढा प्रतिभावान युवा लेखक पाहावयास मिळाला, ज्याने भारतीय संस्कृती, विचारपरंपरा आणि तत्त्वज्ञान आपल्या लेखणीतून मांडले आहे. युवकांचे पुस्तक वाचन कमी झाल्याने समाजातील प्रश्न त्यांना अवगत होण्यास वेळ जातो. स्वप्नील खामकर यांनी फिलॉसॉफीवर उत्तमपणे लिखाण केले असून, त्यांचे हे लेखन आजच्या युवकांसह विचारवंतांनाही दिशादर्शक असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार काशिनाथ दाते आणि खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनीही ‘भारत : द इटर्नल’ या पुस्तकाचे कौतुक करून स्वप्नील खामकर यांना पुस्तकासाठी शुभेच्छा दिल्या.

संजय खामकर म्हणाले की, स्वप्नील खामकर केव्हा लिहितो आणि कोणत्या विषयावर लिहितो, हे कळत नाही. फक्त पुस्तक प्रकाशन जवळ आल्याने याची माहिती मिळते. त्याच्या पुस्तकातून विचार पेरले जाणार असून, युवकांनी वाचनाकडे वळावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. स्वप्नीलला पुस्तक लिहिण्याची आवड असून, संपूर्ण कुटुंब त्याच्या पाठीशी उभे आहे. मुलांचे गुण ओळखून त्यांना वाव द्या. मुलांवर आपली स्वप्ने लादू नका, असा महत्त्वपूर्ण संदेशही संजय खामकर यांनी यावेळी दिला.

ज्येष्ठ साहित्यिक संजय कळमकर यांनी आजची जेन झी पिढी वाचत नाही, अशी ओरड होत असली तरी काही जेन झी युवक उत्तमपणे साहित्याचे लिखाण करत आहेत. ते आव्हानात्मक पुस्तके लिहीत आहेत. त्यामुळे संपूर्ण जेन झीला एकाच मापाने मोजणे चुकीचे असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकाशन सोहळ्यास चर्मकार विकास संघाचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर, संदीपदादा घनदाट, युवा नेते अमन आंबेडकर, महिला बालकल्याणचे बालाजी सोनटक्के, नगरसेवक सुरेश बनसोडे, मधुकर घनदाट, मच्छिंद्र दळवी, प्रतिभा खामकर, आण्णासाहेब खैरे, गुणगौरव सोहळा समितीचे संतोष कानडे, सुरेश शेवाळे, अरुण गाडेकर, सुभाष सोनवणे, संजय कानडे, राजेंद्र धस, सुनील धस, रामदास सातपुते, पाराजी साळे, सुरेश शेवाळे, भारत चिंधे, मनिष कांबळे, आरती सोनग्रा, अरुणा गोयल, रुक्मिणी नन्नावरे आदी उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल संध्या गायकवाड यांचा सन्मान

**महाराष्ट्र राज्य वाहतूक सुरक्षा दल व नागरी संरक्षण संघटनेतर्फे सत्कार**

नगर – जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांना राष्ट्रीय शिक्षक योजना एवं प्रशासन संस्थान (NIEP) यांच्या वतीने राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल महाराष्ट्र राज्य वाहतूक सुरक्षा दल व नागरी संरक्षण संघटना, अहिल्यानगर–नाशिक विभाग यांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करताना विविध उपक्रमांना चालना देत त्यांनी बजावलेल्या योगदानाची राष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेल्याने अहिल्यानगरच्या शैक्षणिक क्षेत्रातही या पुरस्काराचे स्वागत होत आहे.



जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांना राष्ट्रीय शिक्षक योजना एवं प्रशासन संस्थान (NIEP) यांच्या वतीने राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल महाराष्ट्र राज्य वाहतूक सुरक्षा दल व नागरी संरक्षण संघटना, अहिल्यानगर–नाशिक विभाग यांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

या वेळी RSP नाशिक विभागीय उपाध्यक्ष सिकंदर शेख आणि जिल्हा समादेशक प्रकाश मिंड यांच्या हस्ते शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा माध्यमिक वेतन पथकाचे अधीक्षक रामदास म्हस्के, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुनील पंडित, विस्तार अधिकारी भिवसेन पवार आदी उपस्थित होते.

यावेळी सिकंदर शेख म्हणाले, अहिल्यानगर जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी म्हणून संध्या गायकवाड यांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेले योगदान निश्चितच उल्लेखनीय आहे. शिक्षण व्यवस्थेतील विविध प्रश्न, शैक्षणिक उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या हिताशी संबंधित बाबींमध्ये त्यांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे. त्यांच्या या कार्याची राष्ट्रीय पातळीवर दखल घेऊन दिल्ली येथे त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, ही केवळ त्यांच्यासाठी नव्हे तर संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे.

ते पुढे म्हणाले की, शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकारी आणि शिक्षकांसाठी राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार ही प्रेरणादायी बाब आहे. आपल्या कार्यातून गुणवत्तापूर्ण शिक्षणाला प्रोत्साहन देतानाच विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांना सहकार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांचा गौरव होणे आवश्यक आहे. संध्या गायकवाड यांच्या कार्याची राष्ट्रीय स्तरावर झालेली दखल ही जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हा समादेशक प्रकाश मिंड म्हणाले की, महाराष्ट्र राज्य वाहतूक सुरक्षा दल (RSP) विभाग तसेच विविध शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांना शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांचे नेहमीच मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य मिळाले आहे. शाळा, विद्यार्थी आणि शिक्षकांशी संबंधित उपक्रमांना त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक ते सहकार्य केले.

शिक्षण विभाग आणि सामाजिक संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, सुरक्षितता, सामाजिक बांधिलकी आणि जबाबदारीची भावना निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. अशा उपक्रमांना प्रशासकीय पातळीवर मार्गदर्शन व सहकार्य मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. संध्या गायकवाड यांनी या उपक्रमांकडे नेहमीच सकारात्मक दृष्टिकोनातून पाहिले असून, त्यांच्या सहकार्यामुळे अनेक उपक्रम प्रभावीपणे राबविता आले. राष्ट्रीय पातळीवर मिळालेल्या या सन्मानामुळे अहिल्यानगर जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्राची प्रतिष्ठा वाढली असल्याचे त्यांनी सांगितले.

# ‘कॉर्फबॉल प्रिमियर लीग’साठी नगरच्या दिशान गांधी याची निवड

**देश विदेशातील खेळाडूंचा सहभाग, महिनाभर विविध राज्यात सामने रंगणार**



नगर – केंद्र सरकारच्या क्रीडा विकास व प्रोत्साहन योजनेत यावर्षी प्रथमच कॉर्फबॉल प्रिमियर लीग (केपीएल) भारतात आयोजित करण्यात आली आहे. यात भारताच्या प्रमुख खेळाडूंसह इतर देशांतील अनेक आंतरराष्ट्रीय खेळाडू सहभागी होणार आहेत. या लीगमध्ये नगरचा सुपुत्र व आंतरराष्ट्रीय खेळाडू दिशान गांधी याची प्राधान्याने निवड झाली आहे. देशातील विविध राज्यांमध्ये महिनाभर केपीएलचे सामने रंगणार आहेत.

भारतातील ८ ते १० प्रमुख शहरांमध्ये या स्पर्धेचे सामने होणार आहेत. मुले व मुली एकत्रित खेळणाऱ्या जगातील या एकमेव मैदानी खेळाची ओळख तसेच प्रचार, प्रसार या स्पर्धेतून देशभरात होण्यास मदत होईल. गुजरात, पंजाब, मुंबई, राजस्थान, उत्तर प्रदेश, दिल्ली, चेन्नई, हैदराबाद, हरियाणा या ठिकाणी सुमारे महिनाभर स्पर्धेतील सामने होतील.

केपीएलसाठी प्राधान्याने निवड झालेला दिशान गांधी या स्पर्धेसाठी शुक्रवारी दिल्ली येथे रवाना होईल. स्पोर्टी भारत, गेम चेंजर्स व कॉर्फबॉल फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धा होत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय क्रीडा व अन्य विभागाच्या मंत्र्यांनी या स्पर्धेला शुभेच्छा देत पालकांनी या स्पर्धा पाहून आपल्या पाल्यांना कॉर्फबॉल क्रीडा प्रकाराकडे वळण्यास प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन केले आहे.

कॉर्फबॉल प्रिमियर लीगमधील सहभागाबद्दल दिशान गांधी याचे अ.नगर जिल्हा कॉर्फबॉल असोसिएशनने अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या आहेत. या निवडीबद्दल दिशानचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# ‘पीएम विश्वकर्मा योजनेअंतर्गत’ तालुकानिहाय मेळाव्याचे आयोजन

नगर – महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा कार्यालय अहिल्यानगर यांच्या वतीने पीएम विश्वकर्मा योजनेअंतर्गत तालुकानिहाय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यास संबंधित बँक शाखा व्यवस्थापक तसेच अग्रणी जिल्हा बँक व्यवस्थापक उपस्थित राहणार असून, पीएम विश्वकर्मा योजनेअंतर्गत प्रलंबित असलेल्या कर्ज प्रकरणांबाबत लाभार्थ्यांना आवश्यक मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच कर्ज प्रकरणातील अडचणी व आवश्यक कार्यवाहीबाबतही मार्गदर्शन केले जाणार आहे. मेळाव्याचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे : ११ सप्टेंबर – कोपरगाव व राहाता तालुक्यांसाठी पंचायत समिती हॉल, कोपरगाव येथे मेळावा होईल. मेळाव्याची वेळ सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत आहे.

१५ सप्टेंबर – राहुरी, नगर व पारनेर तालुक्यांसाठी पंचायत समिती हॉल, नगर येथे मेळावा होईल. मेळाव्याची वेळ सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत आहे. १७ सप्टेंबर – नेवासा व श्रीरामपूर तालुक्यांसाठी पंचायत समिती हॉल, नेवासा येथे मेळावा होईल. मेळाव्याची वेळ सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत आहे. २२ सप्टेंबर – शेवगाव व पाथर्डी तालुक्यांसाठी पंचायत समिती हॉल, शेवगाव येथे मेळावा होईल. मेळाव्याची वेळ सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत आहे. पीएम विश्वकर्मा योजनेअंतर्गत कर्ज प्रकरणे प्रलंबित असलेले लाभार्थी तसेच योजनेचा लाभ घेण्यास इच्छुक पात्र कारागीरांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# बौद्ध समाजातील अधिकारी होण्याचे स्वप्न’ प्रज्ञा सरकटे यांनी केले साकार

**राज्य कर निरीक्षकपदी निवड; राज्यात १७ वा क्रमांक मिळवल्याबद्दल पंचशील विद्यामंदिरमध्ये अभिमानास्पद सत्कार**

नगर – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन करून राज्य कर निरीक्षकपदी निवड झालेल्या आयु. प्रज्ञा अंबादास सरकटे यांचा समस्त आंबेडकरी समाज आणि पंचशील विद्यामंदिर प्राथमिक शाळेच्या वतीने उत्साहात सत्कार करण्यात आला. प्रज्ञा सरकटे यांनी राज्यात डउ महिला १७ वा क्रमांक मिळवत अहिल्यानगर शहरातील बौद्ध समाजातील पहिली कन्या म्हणून हे उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



प्रज्ञा सरकटे हिची राज्य कर निरीक्षकपदी निवड झाल्याबद्दल तिचा पंचशील विद्या मंदिरमध्ये सत्कार करण्यात आला.

पंचशील विद्यामंदिर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसमोर हा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. गोरगरीब व सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना प्रज्ञा सरकटे यांच्या यशातून प्रेरणा मिळावी, ‘आपणही शिकून अधिकारी होऊ शकतो’ हा आत्मविश्वास विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण व्हावा, या उद्देशाने हा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी नगरसेवक सुरेश बनसोडे, पंचशील विद्यामंदिर संस्थेचे अध्यक्ष सुमेध गायकवाड, प्रा. जयंत गायकवाड, सेवा निवृत्त अपर पोलिस अधीक्षक शाहूराव साळवे, सुनील क्षेत्रे, किरण दाभाडे, अमित काळे, महेश भोसले, सागर ठोकळ, रत्नाताई वाघमारे, प्रा. भीमराव पगारे, रवींद्र कांबळे, प्रा. एल बी जाधव, जयश्री गायकवाड, भाऊसाहेब देठे, प्रा. अंबादास सरकटे, समीर भिंगारदिवे, सचिन शेलार, मुख्याध्यापक उंडे सर, गोसावी मॅडम, उकर्डे सर, साबळे सर, शिरसाठ मॅडम, वांगणे मॅडम, तिवारी मॅडम यांच्यासह समस्त आंबेडकरी समाजाचे कार्यकर्ते, पंचशील विद्यामंदिर प्राथमिक शाळेचे शिक्षक, विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

प्रज्ञा सरकटे या आंबेडकरी चळवळीतील मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व प्रा. अंबादास सरकटे यांच्या कन्या आहेत. सामाजिक आणि शैक्षणिक वातावरणातून मिळालेल्या प्रेरणेच्या जोरावर त्यांनी स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविले आहे.

नगरसेवक सुरेश बनसोडे म्हणाले की, प्रज्ञा सरकटे यांनी मिळविलेले यश हे संपूर्ण समाजासाठी अभिमानाची बाब आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या यशातून प्रेरणा घेऊन मोठी स्वप्ने पाहावीत आणि शिक्षणाच्या माध्यमातून अधिकारी होण्याचे ध्येय निश्चित करावे.

सुमेध गायकवाड म्हणाले की, प्रज्ञा सरकटे यांचे यश हे केवळ त्यांच्या कुटुंबाचे नसून संपूर्ण आंबेडकरी समाजासाठी प्रेरणादायी आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून शिक्षणाच्या बळावर मोठे यश संपादन करता येते, हे त्यांनी सिद्ध केले आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श घेऊन स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून समाजात नवे नेतृत्व निर्माण करावे.

# जिल्हा ग्राहक आयोगात आता आभासी सुनावणीची सुविधा

**राज्य ग्राहक आयोगाचे अध्यक्ष मुकेश शर्मा यांच्या हस्ते ११ सप्टेंबर रोजी होणार उद्घाटन**

नगर – ग्राहकांच्या तक्रारींच्या सुनावणीची प्रक्रिया अधिक सुलभ, गतिमान आणि आधुनिक करण्याच्या दृष्टीने अहमदनगर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगामध्ये आता आभासी पद्धतीने (व्हिडिओ कॉन्फरन्स) सुनावणीची सुविधा उपलब्ध होणार आहे. महाराष्ट्रात जिल्हास्तरावरील ग्राहक आयोगामध्ये प्रथमच ही सुविधा सुरू होत असून, तिचे उद्घाटन शुक्रवार, ११ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता टीव्ही सेंटर येथील प्रशासकीय इमारतीतील ग्राहक आयोगाच्या कार्यालयात होणार आहे.



राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबईचे अध्यक्ष मुकेश व्ही. शर्मा यांच्या हस्ते या आभासी सुनावणी सुविधेचे उद्घाटन करण्यात येणार आहे. यावेळी राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबईच्या सदस्य पूनम महर्षी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. ग्राहकांना त्यांच्या तक्रारींचे निवारण करून घेण्यासाठी न्यायव्यवस्थेपर्यंत सहज पोहोचता यावी, तसेच सुनावणीच्या प्रक्रियेत वेळ आणि श्रमाची बचत व्हावी, या उद्देशाने ग्राहक आयोगाच्या कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून अहमदनगर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगात व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून सुनावणीची सुविधा सुरू करण्यात येत आहे

ग्राहकांच्या तक्रारींच्या निवारणासाठी देशात त्रिस्तरीय ग्राहक आयोगाची रचना करण्यात आली आहे. जिल्हास्तरावर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, राज्यस्तरावर राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, तर राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोग कार्यरत आहे. ग्राहकांना सदोष वस्तू किंवा मूल्य देऊन घेतलेल्या सेवेमध्ये त्रुटी आढळल्यास संबंधित ग्राहक आयोगाकडे तक्रार दाखल करता येते. ग्राहकाने एखाद्या वस्तूसाठी किंवा सेवेसाठी पैसे दिल्यानंतर त्याला अपेक्षित दर्जाची वस्तू अथवा सेवा मिळाली नाही, वस्तूमध्ये दोष आढळला किंवा सेवेमध्ये त्रुटी राहिली, अशा प्रकरणांमध्ये ग्राहक आयोगामार्फत तक्रारींची सुनावणी केली जाते. तक्रारीची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून संबंधित ग्राहकाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न आयोगाच्या माध्यमातून केला जातो.

आभासी सुनावणीची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे विविध कारणांमुळे प्रत्यक्ष आयोगात उपस्थित राहणे शक्य नसलेल्या पक्षकारांना किंवा संबंधितांना व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सुनावणी प्रक्रियेत सहभागी होणे अधिक सुलभ होणार आहे. त्यामुळे ग्राहक न्यायव्यवस्थेतील पारदर्शकता, सुलभता आणि कार्यक्षमता वाढण्यास मदत होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

या कार्यक्रमास अहमदनगर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष सादिक अली बशीर सय्यद, तसेच सदस्य चारु डोंगरे आणि संध्या कसबे उपस्थित राहणार आहेत.

या सुविधेमुळे जिल्ह्यातील ग्राहक तक्रारींच्या सुनावणीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळणार असून, ग्राहक, वकील तसेच संबंधित पक्षकारांसाठी ही सुविधा महत्त्वपूर्ण ठरणार आहे, अशी माहिती ग्राहक आयोग वकील संघटनेचे अध्यक्ष ड. सुनील बी. मुंदडा यांनी दिली.

# श्री बडीसाजन ओसवाल युवक संघ व नगर जल्लोष’तर्फे १३ सप्टेंबर रोजी ‘गणपती बनवा कार्यशाळेचे’ आयोजन

**पर्यावरण पूरक गणेशोत्सवाची घरातून तयारी**

नगर – श्री बडीसाजन ओसवाल युवक संघ आणि नगर जल्लोष (ट्रस्ट) यांच्या संयुक्त विद्यमाने शिल्पकार बालाजी वल्लाल यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने, शाडूमातीपासून गणपती बाप्पाची मूर्ती बनवण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.ही कार्यशाळा १३ सप्टेंबर रोजी सकाळी ११.३० ते १.३० या वेळेत बडीसाजन ओसवाल भवन, आनंद ऋषी हॉस्पिटल शेजारी, स्टेशन रोड, अहिल्यानगर येथे होणार आहे.

या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी प्रवेश फी १०० रुपये असून, नोंदणी आवश्यक आहे. कार्यशाळेत मूर्ती बनवण्यासाठी लागणारी शाडू माती आयोजकांकडून मोफत दिली जाईल. सहभागी होणाऱ्यांनी मूर्ती बनवण्यासाठी छोटा पाट, रुमाल आणि पाण्याची बॉटल सोबत आणणे आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क सागर बोगा ९८६०६१२०४५, मनोजकुमार चोपडा – ९०२८७११६६६, दीपक गुंडू ९९२२१४०१२०, सिद्धार्थ शेटीया – ८०८७७३१९१७

या उपक्रमाला रेडिओ सिटी (९१.१ एफएम) आणि जागरण इनिशिएटिव्हचे रेडियो पार्टनर म्हणून सहकार्य लाभले आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी या कार्यशाळेत सहभागी होऊन पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश सर्वत्र पोहोचवावा, असे आवाहन ही आयोजकांनी केले आहे.

# जीवन पुन्हा नाही; उमेद, उत्साह आणि आनंदाने जगण्याची कला शिका

**(जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन विशेष – १० सप्टेंबर २०२६)**

जीवनाचे मोल केवळ एका गोष्टीवरून समजून घ्या की, एखादे मृत शरीर आहे; जगातील सर्व संपत्ती खर्च करून, अत्याधुनिक रुग्णालये, सरकारे, धार्मिक कर्मकांड या सर्वांनी मिळून प्रयत्न केले, संपूर्ण ब्रह्मांडाची ताकद पणाला लावली, तरी मृत शरीरात एका सेकंदासाठीही प्राण आणता येत नाहीत. म्हणजेच जीवन अनमोल आहे. ते संपविण्याचा अधिकार आपल्याला स्वतःला पण नाही, कारण हे जीवन पालकांची देन आहे. दरवर्षी १० सप्टेंबर रोजी विश्व आत्महत्या प्रतिबंध दिवस जगभरात जनजागृतीसाठी साजरा केला जातो. लोकांच्या मनातील आत्महत्येसारखे वाईट विचार दूर करून सुखद आणि सकारात्मक विचारांचे वातावरण निर्माण करण्यावर भर देणे हा त्याचा उद्देश आहे. आत्महत्येबद्दलचा विचार बदलूया आणि संवादाची सुरुवात करूया ही त्याची संकल्पना असून, २०२४ ते २०२६ या कालावधीसाठी हीच संकल्पना ठेवण्यात आली आहे.

आजच्या आधुनिक युगात आत्महत्यांच्या घटनांमध्ये झालेली मोठी वाढ आपल्याला संकेत देत आहे की, आपण अनुचित वातावरणात वावरतोय. आत्महत्येची कारणे जसे की – मानसिक आरोग्याच्या समस्या, मानसिक खेळांचे बळी ठरणे, एकटेपणा आणि कमकुवत होत चाललेले सामाजिक संबंध, अपयश, शिक्षण आणि करिअरचा दबाव, आर्थिक असुरक्षितता, फसवणूक, भीती, नातेसंबंध तुटणे, सामाजिक तुलना आणि डिजिटल दबाव, हिंसा, गैरवर्तन आणि भेदभाव, मादक पदार्थांचे सेवन किंवा वाईट व्यसन, खोटे देखावे करण्याची सवय, शरीरात किंवा मनात दीर्घकाळ राहणाऱ्या वेदना आणि आजार. अशा अनेक कारणांमुळे आत्महत्यांमध्ये सातत्याने वाढ झाली आहे. यात लवकरच सुधारणा करणे आवश्यक आहे.

जेव्हा आत्महत्या होते, तेव्हा केवळ एका व्यक्तीचा जीव जात नाही, तर त्या कुटुंबात, नातेवाईकांमध्ये, कार्यस्थळी, समाजात आणि संबंधित संपूर्ण समुदायामध्ये कायमस्वरूपी एक जागा रिकामी होते; तसेच सामाजिक, भावनिक आणि आर्थिक परिणाम होतात. आत्महत्या रोखण्यासाठी परस्पर संबंधांमध्ये सहानुभूतीपूर्वक संवादाला प्रोत्साहन देणे अत्यंत गरजेचे आहे. गैरसमज दूर करणे, समस्या सांगणे, मोकळेपणाने आपले म्हणणे मांडणे, सहानुभूती आणि सहकार्याचे वातावरण निर्माण करणे, या गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत. सरकार आणि सामाजिक संस्थांनीही समाजात आनंददायक, सकारात्मक वातावरण टिकवून ठेवण्यासाठी अमूल्य भूमिका बजावली पाहिजे.

ज्या देशात किंवा समाजात अधिक समस्या आणि अडचणी असतात, तेथील वातावरणात राहणारे लोक अधिक आत्महत्या आणि गुन्हे करतात, कारण जगण्यासाठी अधिक संघर्षाचा सामना करावा लागतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या मानसिक आरोग्य ॲटलस २०२४ अहवालानुसार, वर्ष २०२१ मध्ये आत्महत्येमुळे ७,२७,००० मृत्यू झाले. तरुणांमध्ये मृत्यूचे तिसरे सर्वात मोठे कारण आत्महत्या हेच आहे. जागतिक स्तराच्या तुलनेत भारतात आत्महत्यांचे प्रमाण अधिक आहे. महाराष्ट्रातील शेतकरी वर्गाच्या आत्महत्या हा सर्वाधिक चिंतेचा विषय आहे. महाराष्ट्र सरकारच्या आकडेवारीनुसार, राज्यात वर्ष २०२३ मध्ये एकूण ६,६६९ शेतकरी आणि शेतमजुरांनी आत्महत्या केली, तर संपूर्ण भारतात १०,७८६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली होती.

अनेक वेळा आपल्याला माहीत असते की, एखादी गोष्ट आपल्यासाठी नुकसानकारक आहे, तरीही आपण सुधारत नाही. पुष्कळदा छोट्या–छोट्या निरुपयोगी गोष्टींना अधिक महत्त्व दिले जाते, ज्याचा थेट वाईट परिणाम आपल्या आरोग्यावर होतो. आजकाल स्वतःला दुःख देण्यासाठी आपण स्वतःच अधिक जबाबदार आहोत. लवकर राग येणे, मनासारखे काम न झाल्यास आपला संयम गमावणे, इतरांना दोष देणे किंवा द्वेष करणे, इतरांवर आंधळा विश्वास ठेवणे, भावनांच्या भरात वाहून जाणे, स्वार्थ, लोभ, खोटा देखावा करणे आणि प्रतिकूल परिस्थितीतही तो देखावा कायम ठेवणे, समाधानाचा अभाव, सतत जीवनाच्या स्पर्धेत धावत राहणे, वाईट संगत, इतरांच्या आनंदात दुःखी होणे आणि दुःखात आनंदी होणे, मत्सर, लोकांकडून जास्त अपेक्षा ठेवणे, परावलंबी असणे, मानसिक खेळांचे बळी ठरणे, मेहनतीपासून दूर पळणे आणि शॉर्टकटचा अवलंब करणे अशा अनेक गोष्टी माणसाने स्वतःच निर्माण केलेल्या आहेत. माणूस इच्छित असल्यास या गोष्टींवर नियंत्रण ठेवून अधिक चांगले, आरोग्यदायी आणि समाधानी जीवन जगता येऊ शकते. आपल्या चुकांचे परिणामच अनेकदा आपल्याला आत्महत्येच्या विचारांपर्यंत घेऊन जातात. त्यामुळे असे काम किंवा वर्तन करावे, ज्यामुळे आपण अडचणी आणि चुकांपासून दूर राहू शकू.

इतरांवर लगेच विश्वास ठेवू नका, कोणावरही आंधळा विश्वास ठेवू नका. परिस्थितीनुसार आपल्या कामात परिवर्तनशीलता आणा, कौशल्ये शिका. गडद मनोवैज्ञानिक खेळ खेळणाऱ्या लोकांपासून दूर राहा. खोट्या देखाव्यापासून दूर राहा, व्यसनांपासून दूर राहा, वाईट संगत करू नका. पश्चात्ताप करण्यात वेळ वाया घालवू नका; आता काय चांगले करता येईल, याचा विचार करा. चांगल्या लोकांच्या संपर्कात राहा, जे प्रतिकूल परिस्थितीतही तुमची साथ देतील. आधुनिकता आणि सोशल मीडियाचे व्यसन लागू देऊ नका. कोणताही निर्णय घेण्यापूर्वी विचार करा, परिणामांचा अंदाज घ्या आणि त्यानंतर कृती करा. तीव्र राग, भावना किंवा जोशाच्या भरात अनुचित निर्णय घेण्यापासून दूर राहा. आधुनिक जीवनशैली मानवी जीवनासाठी शाप ठरत आहे, तिचे अंधानुकरण करू नका. समाधानी राहा, मेहनतीवर विश्वास ठेवा, आपल्या इच्छा इतरांवर लादू नका, दररोज स्वतःसाठी वेळ काढा, आरोग्यदायी छंदांना प्राधान्य द्या.

शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या तंदुरुस्तीसाठी दररोज व्यायाम करा. निसर्ग, पर्यावरण, पशू–पक्ष्यांचे संरक्षण आणि परोपकाराची भावना जागृत करा, असहाय्यांना मदत करा. आयुष्य नवचैतन्याने जगायचे आहे, केवळ वेळ घालवायचा नाही आहे. चारित्र्य जपा, आपल्या माणसांच्या प्रेमाची, भावनांची कदर करा आणि आपल्या अनमोल जीवनाचे मोल समजून घ्या. आपल्या कृतीमुळे कधीही कोणाला त्रास होऊ नये, अशा जीवनाचा निर्धार करा. जर आपण अनुचित काम करत नसू, तर लोक काय म्हणतील याचा विचार करू नका. कोणतेही काम छोटे–मोठे नसते. इतरांच्या आनंदात आनंदी होणे आणि इतरांच्या दुःखात त्यांच्या वेदना वाटून घेणे हीच माणुसकी आहे, हेच मानवाचे कर्तव्य आहे. अशा सवयी आणि वातावरणात जगणारी व्यक्ती नेहमी सकारात्मक ऊर्जेने ओतप्रोत असते, ती त्रास आणि अडचणींपासून पळून जात नाही, तर त्यांचा ठामपणे सामना करते. ती नेहमी शांत, सजग, समाधानी आणि प्रसन्न राहते आणि आपल्यालाही असेच जगायचे आहे.

लुई ब्रेल, अब्राहम लिंकन, फ्लोरेन्स नाइटिंगेल, महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, थॉमस एडिसन, अलेक्झांडर ग्रॅहम बेल, मेरी क्युरी, डॉ. बी. आर. आंबेडकर, श्रीनिवास रामानुजन, चार्ली चॅप्लिन, नेल्सन मंडेला, मदर तेरेसा, ए. पी. जे. अब्दुल कलाम, दशरथ मांझी, बचेंद्री पाल, सिंधुताई सपकाळ, अरुणिमा सिन्हा, मलाला युसुफझाई, निक वुजिसिक, तुळशी गौडा, सोनम वांगचुक, मेरी कोम यांसारखे असंख्य लोक होऊन गेले आणि आजही आहेत, ज्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून संघर्षमय जीवनाला एक आदर्श बनविले आणि जगात मार्गदर्शक म्हणून प्रकाशमान झाले.तणावामुळे हृदयविकाराचा झटका, पक्षाघात किंवा इतर गंभीर आजारांच्या समस्या वेगाने वाढत आहेत. कोणत्याही समस्येचा ताण घेऊ नका. तणाव व्यवस्थापनाची कला आपण आपल्या देशातील नेत्यांकडून शिकली पाहिजे. अतिसामान्य ग्रामीण व्यक्ती, साधारण कद–काठीचा, जवळजवळ अशिक्षित गरीब मजूर दशरथ मांझी यांनी कोणाच्याही मदतीशिवाय २२ वर्षांच्या अथक परिश्रमातून एकट्याने डोंगर कापून लोकांच्या सोयीसाठी रस्ता तयार केला. एवढ्या अडचणींमध्ये त्यांनी इतिहास घडविला, तर आपण आयुष्यात एवढ्या लवकर का हार स्वीकारायची? यश मिळेपर्यंत प्रयत्न सुरू ठेवा. आपल्या कामात छोटीशी मुंगीही कधी हार मानत नाही; मग आपण तर माणूस आहोत. आपला निर्धार आणि धैर्य बुलंद असेल तर आपणही नक्कीच जिंकू. अडचणी, अपयश किंवा दुःख आले, किंवा कधीही वाईट विचार त्रास देऊ लागले, तर एक गोष्ट लक्षात ठेवा की, जगात आपल्यापेक्षाही अधिक वाईट परिस्थितीत लोक जगत आहेत आणि वेळ थांबत नाही. काळ बदलतोच; आपलाही काळ बदलेल नक्कीच.



– **डॉ. प्रितम भि. गेडाम**
मो. ८२३७४१७०४१

# धम्माल मनोरंजन

**सुविचार**

उदयोग व खेळ यांचे मिश्रण झाले की तुम्ही समर्थ व सुखी व्हाल.



## दिनविशेष ११ सप्टेंबर

`१८१६ : कार्ल झाइस जर्मन संशोधक यांचा जन्म.१८६२ : ओ. हेन्री इंग्लिश लेखक यांचा जन्म.

१८८४ : सुधीमय प्रामाणिकफ भारतीय कार्यकर्ते आणि राजकारणी यांचा जन्म. (मृत्यू : २ ऑक्टोबर १९७४)

१८८५ : डी. एच. लॉरेन्स इंग्लिश कादंबरीकार, कवी, नाटककार यांचा जन्म. (मृत्यू : २ मार्च १९३०)

१८९५ : आचार्य विनोबा भावेफ भूदान चळवळीचे प्रणेते, म.गांधींचे शिष्य यांचा जन्म. (मृत्यू : १५ नोव्हेंबर १९८२)१९०१ : रावजी देशपांडे साहित्यिक आत्माराम यांचा जन्म. (मृत्यू : ८ मे १९८२)

१९११ : लाला अमरनाथ भारतीय क्रिकेटपटू यांचा जन्म. (मृत्यू : ५ ऑगस्ट २०००)१९१५ : पुपुल जयकर भारतीय कला व संस्कृतीच्या पुरस्कर्त्या यांचा जन्म. (मृत्यू : २९ मार्च १९९७)१९१७ : फर्डिनांड मार्कोसफ फिलिपाइन्सचे १० वे राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म. (मृत्यू : २८ सप्टेंबर १९८९)१९३९ : चार्ल्स गेशेके ऍडॉब सिस्टम चे संस्थापक यांचा जन्म.१९५० : मोहन मधुकर भागवतफ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक यांचा जन्म.१९७६ : मुरली कार्तिक भारतीय क्रिकेटर यांचा जन्म.

१९८२ : श्रीया शरण तामिळ चित्रपट अभिनेत्री यांचा जन्म. मृत्यू :

१८८८ : दॉमिंगो फॉस्तिनो सार्मियेंतोफ अर्टिजेंनाचे राष्ट्राध्यक्ष यांचे निधन.

१९२१ : सब्रुमण्यम भारतीफ तामिळ साहित्यिक यांचे निधन. (जन्म : ११ डिसेंबर १८८२)

१९४८ : बॅ. मुहम्मद अली जिना पाकिस्तानचे प्रणेते यांचे निधन. (जन्म : २५ डिसेंबर १८७६)

१९६४ : गजानन मुक्तिबोध हिंदी कवी, लेखक, टीकाकार व संपादक यांचे निधन. (जन्म : १३ नोव्हेंबर १९१७)

१९७१ : निकिता क्रुश्चेव्ह सोव्हिएत युनियनचे राष्ट्राध्यक्ष यांचे निधन. (जन्म : १५ एप्रिल १८९४)

१९७३ : साल्वादोर ॲलेंदे चिलीचे राष्ट्राध्यक्ष याचं निधन.

१९७३ : नीम करळी बाबा भारतीय तत्त्वज्ञ आणि गुरू यांचे निधन.

१९७८ : जॉर्जी मार्कोव्ह बल्गेरियाचे कवी यांना फाशी देण्यात आली.


१९८७ : महादेवी वर्मा हिन्दी कवयित्री, स्वातंत्र्यसनैिक, शिक्षणतज्ज्ञ यांचे निधन. (जन्म : २६ मार्च १९०७)

१९९३ : अभी भट्टाचार्यफ चित्रपट सृष्टीतील अभिनेते यांचे निधन.

१९९८ : प्रिं. नोशीरवान दोराबजी क्रिकेटपटू, कुशल क्रीडा संघटक क्रीडा महर्षी यांचे निधन. (जन्म : १० ऑक्टोबर १९०९)

२०११ : अंजली गुप्ता भारतीय सैनिक व पायलट यांचे निधन.

## महाशब्दकोडे



### आडवे संकेत

१) हरकत घेणे
५) शद्बकोडे बनवायचे असेल तर ही जास्त असावी लागते.
९) तुमसर येथे तयार झालेली
१०) शद्ब एकत्र केले तर हे बनते
११) कवच, पापुद्रा
१२) बगिचा
१३) डोळ्यातून पाणी आणणे
१४) भारभार
१६) एक तृणधान्य
१९) सामर्थ्य
२०) आसनाचा एक प्रकार
२३) दुध
२४) गाभा
२५) ज्ञानेश्वराने अर्पिलेले
२८) विष्णू
३१) मयासुर राक्षसाने बांधलेली अद्‌भूत वास्तू
३३) विक्षिप्त मनुष्य
३४) सोने ३५) रामराम
३७) राबता, शेत
३८) दुष्ट बेत
४०) गाभा
४१) फेरा
४२) सातार्‍यापासून जवळच असलेला एक किल्ला
४४) एका जातीचे नाव
४६) घंटी चा नाद
४७) घाईघाईने
४९) शरीरावरील कोमल केस
५१) जागृती, जाग
५३) शंकर
५४) भुट्टा, तुरा
५५) निवडक रत्न, हुशार मुलगी
५६) हृदय

### उभे संकेत

१) दुखणाईत, उत्सुक
२) डमरु चा आवाज
३) ताणणे, उघडणे
४) सुरु, चालू
५) जमेपर्यंत
६) हळू, मंद
७) भारतरत्नाखालोखालचा पुरस्कार
८) येणे
१०) दुपारी जेवणानंतरची अल्प झोप
१५) वाईट सवय
१७) जेरबंद, जेल
१८) चाल, रित, वहीवाट
२१) संपूर्ण
२२) स्त्रियांचा एक अलंकार
२६) एक राग
२७) तपकीर, धमणी
२९) नंबरप्रमाणे
३०) मध्यान्हीची भयंकर उष्णता
३२) भांडण, वाद
३३) खडबडीत
३६) मरण्याची दशा
३९) एस.टी. सुरु करण्याचा आवाज
४२) पुरण शिजवून आमटी वगैरे करिता त्यातील काढतात ते पाणी
४३) समुदाय, वर्ग, सेवक
४४) व्यंजनापासूनच्या बारा स्वरांच्या संयोगाने तयार होणारी मालीका
४५) रेवतीचा पती
४८) राग आणणारा
५०) भार ५१) धनादेश
५२) तेलाची बेरी

### मागील उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रा | क्ष | स | वि | वा | ह | | | आ | ग | पा | ख | ड |
| धा | | र | | | सु | त्र | | | | रा | | बा |
| र | म | ता | रा | म | | | अ | जा | त | श | त्रू | |
| म | री | ज | | | | | मा | र | | र | | व |
| ण | | | र | क्षा | बं | ध | न | | य | | म | त |
| | म | हि | वा | ल | | | त | न | म | न | ध | न |
| न | स | | सु | न | य | न | | व | रा | ह | | |
| का | क | प | द | | था | व | र | | ज | र | त्का | रु |
| र | | सं | गी | त | का | र | | गं | | | | प |
| घं | | त | | ग | ळी | | हं | गा | म | | सा | |
| टा | क | | स | म | | न | स | ती | उ | ठा | ठे | व |
| | वा | | भ | ग | वा | | | र | | | बा | ज |
| क | ल | दा | र | | रा | क्ष | स | | बा | ला | जी | |




१) शरिरातील संस्थांमधील वंगनाचा घटक म्हणून खालीलपैकी काय उपयोगी ठरते?
अ)स्नीग्धाम्ले ब)कर्बोदके क)पाणी ड) पेशीद्रव्ये

२) सुपारी लागवड समुद्र किनार्‍यापासून फार दुर अंतरावर होऊ शकत नाही कारण....?
अ) निर्यातीच्या दृष्टीने ते सोयीचे ठरते
ब) सुपारीला खार्‍या वार्‍याची गरज असते
क) सुपारी उष्ण व दमट हवामानातील पिक आहे
ड) सुपारीला समुद्राकाठची खारवट जमीन मानवते

३) अंजन झाडापासून दोरखंड बनविण्यासाठी कोणता जिल्हा प्रसिद्ध आहे?
अ) रायगड ब)रत्नागिरी क)पुणे ड)अकोला

४) शिवाजी महाराजांच्या हाताचा व पायाचा ठसा कोणत्या किल्ल्यामधे जतन करुन ठेवला आहे?
अ)प्रतापगड ब) सिंधदुर्ग क)कोंडाणा ड) सिंहगड

५) एक खुर्ची ५६ रुपयास विकल्याने तिच्या खरेदी इतका शेकडा नफा होतो तर त्या खुर्चीची खरेदीची किंमत काय?
अ)४६ रु. ब)४८ रु. क)४०रु.ड)४२ रु.

६) भारताच्या आर्थिक नियोजनाचे खालीलपैकी कोणते उद्दीष्ट नाही?
अ)लोकसंख्या वाढ ब)रोजगार निर्मिती
क)स्वावलंबन ड)औद्योगिक वाढ

७) तांदुळाला सुवास आणणाला घटक कोणता ?
अ)अल्फा फर्नेसेन ब) पायरोलिन
क)कॅरोटिन ड) सिपट्रॉल

८) एका समलंब चौकोनाच्या समांतर बाजू अनुक्रमे १२ सें.मी. व १४ सें.मी. आहेत व क्षेत्रफळ ९१ चौ. से.मी आहे तर समांतर बाजूमधील लंबांतर किती?
अ)१० सें.मी ब)६ सें.मी. क)७ सें.मी ड)१२ सें.मी.

९) आंब्यावर आढळणार्‍या कोणत्या किडीमुळे मोहोर गळून जातो? अ)सोंड ब)कोळी क)खोड ड)पिठ्या

१०) राजुने एक सायकल ५४० रुपयास विकली तेव्हा त्याला १० टक्के तोटा झाला जर २० टक्के नफा व्हावा अशी त्याची इच्छा असती तर त्याने ती सायकल किती रुपयास विकायला हवी होती?
अ)९०० रु. ब)७२० रु. क)७८० रु. ड) ८६० रु.

११) गजाननरावनी आपल्या मळ्यात १/३ भागात उस लावला, १/४ भागात भुईमुंग लावला व उरलेल्या २५ एकरात ज्वारी लावली तर गजाननरावांचे एकूण किती एकर शेत आहे?
अ)९० एकर ब)६० एकर क)७२ एकर ड ) ८० एकर

१२) हंगामी पोलिस पाटलाची नेमणूक कोण करतो?
अ)उपजिल्हाधिकारी ब)तहसिलदार
क)मुख्य कार्यकारी अधिकारी ड)जिल्हाधिकारी

१३) ६४ चौरस सें.मी क्षेत्रफळ असलेले व बाजू पूर्णांकात असलेले चौरस सोडून एकूण किती आयात काढता येतील?
अ)३ ब)५ क)८ ड)९

१४) अद्रकाची अधिक उत्पादन देणारी जात कोणती?
अ)पुना ब)वायनाड क)रिओद जानिरो ड) माहिम

१५) दोन संख्यांचा मसावी सात असून त्याचा लसावी ७२ आहे त्या संख्या ३:४ प्रमाणात आहेत तर त्या संख्या कोणत्या?
अ)१६,१८ब)२०,२२ क)१८,२४ ड)२४,२६


१६) फळे व भाजीपाला हे संरक्षण अन्न समजले जाते त्याचे प्रमुख कारण म्हणजे त्यापासून प्रामुख्याने काय मिळतात?
अ)जीवनसत्त्वे ब)खनिजे क)स्निग्धपदार्थ ड) अ व ब

१७) ऑक्टोबर २००४ च्या दुसर्‍या शनिवारी ९ तारिख होती तर त्या महिन्यातील खालीलपैकी कोणता वार पाच वेळा येणार नाही?
अ)सोमवार ब)मंगळवार क)बुधवार ड)गुरुवार

उत्तरः (१-क), (२-क ), (३-ब), (४-ब ), (५-क), (६-अ), (७-ब ), (८-क ), (९-ड), (१०-ब), (११-ब), (१२-ब), (१३-अ), (१४-क),(१५-क ), (१६-ड), (१७-ब )

## फिल्मी शब्दकोडे





### आडवे संकेत

१) सन् १९७५ में बनी फिल्म शोले का खलनायक.
६) इस फिल्म में हृत्विक रोशन का डबल रोल था.
११) आपके प्यार में हम संवरने लगे.... यह गाना इस फिल्म का है.
१२) दिल्ली XXXXXXX (फिल्म)
१३) चलते XXXXX (फिल्म)
१४) हम किसीसे XX नही (फिल्म)
१५) सन् १९८५ में बनी यह फिल्म अभिनेत्री फरहा की पहली फिल्म थी.
१७) ओम XX जगदीश (फिल्म)
१८) निर्माता निर्देशक राजकुमार कोहली का अभिनेता बेटा.
१९) आपकी XXX (फिल्म)
२२) सन् १९८६ में निर्देशक के. राघवेंद्रराव की इस फिल्म में जितेंद्र, श्रीदेवी, राज बब्बर और पद्‌मिनी कोल्हापुरे थे.
२४) आमिर खान और ग्रेसी सिंह अभिनीत फिल्म.
२६) सन् २००२ में बनी फिल्म गुनाह का हिरो. (सिर्फ नाम)
२७) XXX से क्या डरना (फिल्म)
३०) XXXXX वर्मा (निर्माता/निर्देशक)
३३) सन् १९८१ में फिल्म रॉकी की हिरोईन.

### उभे संकेत

१) कभी खुशी कभी गम इस फिल्म में जया बच्चन के पती.
२) XX बिन मछली नृत्य बिन बिजली (फिल्म)
३) कादर XX (अभिनेता/खलनायक/संवाद लेखक)
४) सन् १९९१ में बनी फिल्म प्रहार का नायक. (सिर्फ नाम)
५) सन् १९९८ में निर्देशक संगीत सिवन की इस फिल्म में सनी देओल और सुश्मिता सेन थे.
७) सन् १९९९ में फिरोज ईराणी के निर्देशन में बनी इस फिल्म में जैकी श्रॉफ मेहमान कलाकार थे.
८) मिथून चक्रवर्ती, पद्‌मिनी कोल्हापुरे, डॅनी और बिंदु अभिनीत फिल्म.
९) सन् १९९३ में बनी इस फिल्म में वेंकटेश और श्रीदेवी थे.
१०) सन् १९९९ में बनी इस फिल्म में महिमा चौधरी का डबल रोल था.
१३) साजन XX ससुराल (फिल्म)
१६) सन् १९९६ में बनी फिल्म खामोशी द म्युझिकल के संगीतकार.
२०) XX चटर्जी (निर्माता/निर्देशक)
२१) अमिताभ बच्चन और जितेंद्र अभिनीत एकमात्र फिल्म.
२३) अभिनेती काजोल की अभिनेत्री माँ.
२५) इस फिल्म में राजेश खन्ना, स्मिता पाटील और श्रीदेवी थे.
२८) XX बेनेगल (निर्माता/निर्देशक)
२९) XX द ग्रेट (फिल्म)
३०) XX बलराम (फिल्म)
३१) XX किशन (फिल्म)
३२) XX के लिए कुछ भी करेगा (फिल्म)

### मागील फिल्मी उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | री | ना | क | पु | र | | अ | मि | षा | प | टे | ल |
| भी | | गा | | | | | मो | | | रे | | |
| | अ | र्जू | न | रा | म | पा | ल | | | श | रा | बी |
| रा | | न | | के | | | | मो | ह | रा | | |
| नी | | | | श | | जा | दु | | | व | | जा |
| | ह | ति | क | रो | श | न | | दा | | ल | गा | न |
| हे | | | | श | | म | हा | रा | जा | | | से |
| रा | म | ल | ख | न | | स | | | न | ई | | प्या |
| फे | | | ल | | ह | म | रा | ज | | | | रा |
| री | | दि | ना | | | झा | | मा | ध | व | न | |
| | | | य | स | | क | मा | ई | | जु | | ए |
| अ | चा | न | क | | | रो | | रा | | द | स्त | क |
| | चा | | | ऋ | षी | | रा | जा | की | | | ता |

**विनोद**



मुलगा: – 'आई, तू दिलेली पाकिटे मी पोस्टात टाकली. पण, तू तिकिटे मात्र चुकीची लावली होतीस.' आई:–कशी काय?

मुलगा:–अग, लंकेला पाठवायच्या पाकिटावर तु कमी किमतीचे, तर कलकत्त्याला पाठविण्याच्या पाकिटावर जास्त किमतीचे तिकीटे तिकीट लावलेस.

आई:–अरे, मग ती पाकिटं परत नाही का आणायची।

मुलगा:–'त्याची काय गरज, तूझी चूक मी तिथेच सुधारली बघ।'

आई:–'काय केलंस तू?'

मुलगा:–'मी दोन्ही पाकिटावरचे पत्तेच बदलून टाकले.'

**चारोळी**

हातात हात घेऊन
आपण कधीच नाही फिरलो
वादळालाही शांत करुन
ऐकमेकांसाठीच उरलो.

# कारगिलच्या दुर्गम भूमीत ‘पंचकोश’ शिक्षणाचा दीप

### अहिल्यानगरचे अशोक सचदेव यांचे शिक्षकांना मार्गदर्शन; रोज डोंगर-दऱ्या पार करून शाळेत येणाऱ्या कारगिलच्या मुलांना शिकवला ‘शिक्षणाचा खरा अर्थ’

नगर – बर्फाच्छादित पर्वतरांगा, खडतर भौगोलिक परिस्थिती आणि दैनंदिन जीवनातील असंख्य आव्हाने... अशा परिस्थितीतही शिक्षणाची आस मनात बाळगून दररोज मोठे अंतर पार करून शाळेची वाट धरणाऱ्या कारगिलमधील विद्यार्थ्यांच्या जिद्दीला बळ देण्यासाठी त्या भागात कार्यरत असलेल्या शिक्षकांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम नुकताच पार पडला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० अंतर्गत ECA (early childhood association) च्या वतीने या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

भारतीय ज्ञानपरंपरेवर आधारित ‘पंचकोश शिक्षण पद्धती’ या विषयावर कारगिल, लडाखच्या प्रशिक्षणामध्ये अहिल्यानगर शहरातील चित्रकुट इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक सचदेव यांनी पंचकोश शिक्षण पद्धतीवर सविस्तर मार्गदर्शन केले. पंचकोश शिक्षण पध्दतीचा सर्वाधिक लाभ वयोवर्षे २ ते ६ वर्षातील विद्यार्थ्यांसाठी होतो.

या विशेष प्रशिक्षणासाठी संपूर्ण भारतातून निवडक व्यक्तींना व्याख्यान व मार्गदर्शनासाठी आमंत्रित करण्यात आले होते. त्यामध्ये अशोक सचदेव यांचा समावेश करण्यात आला. कारगिलसारख्या दुर्गम प्रदेशातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा, शिक्षकांचे प्रयत्न आणि भारतीय मूल्यांवर आधारित सर्वांगीण शिक्षण यांची सांगड घालण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

अशोक सचदेव यांनी पंचकोश संकल्पनेतील अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय कोश यांची सविस्तर मांडणी केली. विद्यार्थ्यांचा केवळ अभ्यासातील बौद्धिक विकास न करता त्यांच्या शरीराचा, प्राणशक्तीचा, मनाचा, बुद्धीचा तसेच आनंदी आणि संतुलित व्यक्तिमत्त्वाचा विकास साधणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.भारतीय शिक्षणपरंपरेतील ही प्राचीन आणि समग्र संकल्पना आधुनिक शिक्षणव्यवस्थेत प्रभावीपणे रुजविण्याचा प्रयत्न राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या माध्यमातून होत आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वातील प्रत्येक पैलूला स्पर्श करणारे शिक्षण देणे, त्यांच्या क्षमता ओळखणे आणि त्यांना आत्मविश्वासाने पुढे जाण्यास सक्षम करणे, हा पंचकोश शिक्षणाचा केंद्रबिंदू असल्याचे सचदेव यांनी सांगितले.



कारगिलमधील विद्यार्थ्यांच्या जिद्दीला बळ देण्यासाठी त्या भागात कार्यरत असलेल्या शिक्षकांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला.

या प्रशिक्षणाचे सर्वांत भावनिक आणि प्रेरणादायी वैशिष्ट्य म्हणजे कारगिलमधील विद्यार्थ्यांचा शिक्षणासाठीचा संघर्ष. प्रतिकूल भौगोलिक परिस्थिती असतानाही अनेक विद्यार्थी दररोज मोठे अंतर पार करून शाळेत पोहोचतात. शिक्षण घेण्याची त्यांची जिद्द, शिक्षकांची बांधिलकी आणि प्रतिकूल परिस्थितीतही ज्ञानाची वाट धरलेली ही पावले प्रशिक्षणार्थींसाठी प्रेरणादायी ठरली. डोंगर-दऱ्या, थंडी आणि आव्हानात्मक परिस्थिती यांना न जुमानता शिक्षणासाठी पुढे जाणारी ही मुले समाजाला एक मोठा संदेश देतात. शाळा ही केवळ चार भिंतींची जागा नसून स्वप्नांना आकार देणारे आणि आयुष्य बदलणारे केंद्र आहे, याची जाणीव कारगिलच्या या अनुभवातून झाली.

यावेळी अशोक सचदेव म्हणाले की, भारतीय शिक्षणपद्धतीची मुळे आपल्या संस्कृतीत आणि ज्ञानपरंपरेत खोलवर रुजलेली आहेत. पंचकोश शिक्षण विद्यार्थ्याच्या केवळ बौद्धिक विकासावर भर न देता त्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासाचा विचार करते. ते पुढे म्हणाले की, कारगिलच्या भूमीत मिळालेला अनुभव शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक समृद्ध करणारा ठरला. अत्यंत कठीण परिस्थितीतही शिक्षणाची आस जपणारी मुले आणि त्यांच्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करणारे शिक्षक पाहणे हा आयुष्यभर लक्षात राहणारा अनुभव आहे. या प्रशिक्षणातून मिळालेले ज्ञान आणि अनुभव शिक्षक व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवून भारतीय मूल्ये आणि आधुनिक शिक्षण यांचा समन्वय साधण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

या उपक्रमाचा एक महत्त्वपूर्ण भाग म्हणून NIPUN भारत धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीवर लक्ष केंद्रित करून पूर्वप्राथमिक शाळांमधील शिक्षकांसाठी ECA Summit आयोजित करण्यात आली होती. बालकांच्या पायाभूत शिक्षणाला भक्कम आधार देणे, शिक्षकांचे व्यावसायिक कौशल्य वाढविणे आणि बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी आधुनिक व परिणामकारक पद्धतींचा वापर करणे, हा या समिटचा केंद्रबिंदू होता.

यावेळी डॉ. फारूक वासिल (संचालक, BELA आणि Thinksite) यांनी समकालीन जगातील शिक्षण आणि शिक्षकांच्या व्यावसायिक विकासावर मार्गदर्शन केले. संतोष व्हेंट्रिलोक्विस्ट आणि अस्मा झैदी (संस्थापक, Let's Read कार्यक्रम) यांनी पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अधिक मनोरंजक पद्धतीने कसे विकसित करता येईल, याबाबत संवादात्मक मार्गदर्शन केले. शाह इफला यांनी कथाकथनाच्या विविध तंत्रांचे प्रात्यक्षिक सादर केले. लहान मुलांपर्यंत शिक्षण पोहोचविताना गोष्ट, कल्पनाशक्ती आणि संवाद यांचा प्रभावी वापर कसा करता येतो, हे त्यांनी दाखवून दिले. कौसर रझवी यांनी लहान वयातील मुलांवर हवामान बदलाचा होणारा परिणाम यावर मार्गदर्शन केले. समरीन हमदानी यांनी बाल संरक्षण हा छएझ आणि छखझणछ भारताच्या अंमलबजावणीतील महत्त्वाचा घटक असल्याचे स्पष्ट केले. डॉ. पद्मा ओथसल यांनी डएउचजडमधील शिक्षण पद्धतीची ओळख करून देत स्थानिक परिस्थितीशी जोडलेले शिक्षण किती प्रभावी ठरू शकते, यावर प्रकाश टाकला.

कारगिलच्या भूमीत झालेल्या या प्रशिक्षणातून भारतीय ज्ञानपरंपरा, आधुनिक शैक्षणिक धोरणे, बालकांचा सर्वांगीण विकास आणि प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षणाची जिद्द यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला. अशोक सचदेव यांच्या मार्गदर्शनामुळे अहिल्यानगरच्या शैक्षणिक क्षेत्रालाही राष्ट्रीय स्तरावर विशेष स्थान मिळाले.



## गुरुवाणी – ४६
## आलोचना से निर्मलता

पर्युषण पर्व हे आत्मसिद्धीचे पर्व आहे. ही सिद्धी करायची तर प्रथम शुद्धी करावी लागेल आणि त्यासाठी आधी अशुद्धी शोधावी लागेल. मी असा का आहे? याचे कारण शोधले पाहिजे. मी कोण आहे? ही साधना केली तर उपायही मिळेल. आतून अनुभूती झाली पाहिजे. फक्त बोलून आत्मानुभूती होत नाही. मी क्रोधी, अहंकारी, कपटी, लोभी, विकारी, हिंसक आहे हे आजचे सत्य आहे. हे स्व रूप ओळखले तरच त्यापासून मुक्त होता येईल. दुसऱ्यांनी सांगितले असेल की, तू रागीट आहे. पण तुम्ही ते मान्य करत नाही. तुम्ही जेव्हा स्पष्टीकरण देता तेव्हा तुम्ही तुमच्या वरिष्ठांना खोटं ठरवत असता. जे तुम्ही स्विकार करू शकत नाही ते तुम्ही सुधारू शकत नाही. यासाठी पर्युषण पर्वाची मोठी साधना ’आलोचना’ आहे. आलोचना म्हणजे ’मी माझ्या चुकांना स्वतः च्या डोळ्यांनी पाहत आहे’. ज्या ज्या चुका तुम्ही स्वतः मान्य कराल त्या समाप्त होतील. हे ’आगम’चे विधान आहे. आलोचना केल्याने तुमच्यातील काटे निघून जातील. सिद्धीचा मार्ग मोकळा होईल. तीर्थंकर महावीर यांनी सामान्य व्यक्ती पासून ते शिखर पुरुषांना मोक्षप्राप्तीचा पहिला उपाय सांगितला आहे, तो म्हणजे ’आलोचना’. यापासूनच आत्मसाक्षात्कार होतो. स्वतःला कळलं पाहिजे मी पाप केले आहे. पायात काटा रूतला तर काढून टाकता, पण हृदयातील काटा सांभाळून ठेवता. कोणी अपमान केला, काम नाही केलं तर मनाला काटा टोचतो. चोवीस तास हे चालू असते. पण तुम्ही तो काटे रुपी कचरा साफ करत नाही. तुमचं हृदय कचरा कुंडी बनत चाललंय. तुम्ही कचरा आत येऊच दिला नाही तर त्याचे नकारात्मक परिणामही होणार नाहीत. इन्फ क्शन आत गेल्यावर वाढतच राहते. याचा त्रास तुम्हाला स्वतः लाच होईल. प्रेम फेकून दिले जाते आणि द्वेष पकडून ठेवला जातो. आतलं दूषित गोदाम साफ करायचे काम या पर्वात केलं पाहिजे. आतील कचराच निगेटिव्ह विचार जन्माला घालतो. कचराकुंडीत गुलाबाचा ताजा हार टाकला तरी काही वेळाने दुर्गंधीच येणार. नालीचे पाणी गंगेत गेल्यावर गंगाजल होते.पण गंगेचे पाणी नालीत गेल्यावर त्याला गंगाजल म्हणत नाही. हे आलोचना सूत्र आहे. आलोचना सें निर्मलता आती है!

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# ११ सप्टेंबरचा बँक संप; ‘पाच दिवसांचा आठवडा’सह द्विपक्षीय कराराच्या अंमलबजावणीसाठी लढा

### २८ ते ३० सप्टेंबरला तीन दिवसांचा संप; मागण्या मान्य न झाल्यास ऑक्टोबरमध्ये बेमुदत संपाचा इशारा

नगर – पाच दिवसांचा बँकिंग आठवडा लागू करावा, तसेच कामगिरीशी निगडित प्रोत्साहनपर भत्त्यातील (Performance Linked Incentive) भेदभाव दूर करून द्विपक्षीय करारातील तरतुदींची प्रामाणिक अंमलबजावणी करावी, या प्रमुख मागण्यांसाठी देशभरातील बँक कर्मचारी ११ सप्टेंबर रोजी संपावर जाणार आहेत. हा संप केवळ पाच दिवसांच्या आठवड्यासाठी नसून, द्विपक्षीय करार, सामूहिक सौदेबाजीचा अधिकार आणि बँक कर्मचाऱ्यांच्या संघटित चळवळीच्या अस्तित्वासाठीचा संघर्ष असल्याचे महाराष्ट्र स्टेट बँक एम्प्लॉईज फेडरेशनचे अध्यक्ष तथा ऑल इंडिया बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज फेडरेशनचे जनरल सेक्रेटरी धनंजय कुलकर्णी यांनी स्पष्ट केले.

अहिल्यानगर येथे याबाबत माहिती देताना बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज युनियन पुणे युनिटचे ऑर्गनायझेशन सेक्रेटरी कॉ. प्रकाश कोटा यांनी सांगितले की, पाच दिवसांचा बँकिंग आठवडा ही कर्मचाऱ्यांची अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. २०१५ मधील दहाव्या द्विपक्षीय कराराच्या वेळी महिन्यातील चारही शनिवारी अर्धा दिवस काम करण्याऐवजी दुसरा व चौथा शनिवार पूर्ण सुट्टी आणि उर्वरित दोन शनिवारी पूर्ण दिवस कामकाजाची व्यवस्था स्वीकारण्यात आली. त्यानंतर अकराव्या आणि बाराव्या द्विपक्षीय कराराच्या प्रक्रियेत उर्वरित शनिवारही सुट्टी देण्याबाबत सहमती झाली आणि प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला. त्यामुळे आता मान्य झालेली बाब अनिश्चित काळासाठी प्रलंबित ठेवणे म्हणजे द्विपक्षीय वाटाघाटींच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. करार हे केवळ कागदावरील दस्तऐवज नसून परस्परविश्वासाचे प्रतीक आहेत. मान्य तरतुदींची अंमलबजावणीच होणार नसेल तर कर्मचारी संघटनांनी व्यवस्थापनाशी वाटाघाटी का कराव्यात, असा सवालही उपस्थित करण्यात आला.

पाच दिवसांचा आठवडा लागू झाल्यास कर्मचाऱ्यांचे कामाचे तास कमी होतील, असा केला जाणारा प्रचार दिशाभूल करणारा असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे. प्रस्तावित व्यवस्थेत सोमवार ते शुक्रवार या पाच दिवसांत दररोज सुमारे ४० मिनिटे कामकाजाची वाढ होणार आहे. त्यामुळे एकूण कामाच्या वेळेत कपात होणार नसून कामकाजाची पुनर्रचना होणार आहे.

दिवसअखेरचा ताळमेळ, कर्जवसुली, सरकारी योजनांची अंमलबजावणी, लेखापरीक्षण, अनुपालन, डिजिटल व्यवहारांशी संबंधित तक्रारी आणि विविध प्रशासकीय कामांमुळे बँक कर्मचारी नियमित कार्यालयीन वेळेपेक्षा अधिक काळ काम करतात. त्यातच अनेक शाखांमध्ये मनुष्यबळाची कमतरता असल्याने कर्मचाऱ्यांवरील ताण वाढत आहे.

आरबीआय, विमा क्षेत्रासह वित्तीय क्षेत्रातील अनेक संस्थांमध्ये पाच दिवसांचा आठवडा लागू आहे. यूपीआय, एटीएम, इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, कॅश डिपॉझिट मशीन आणि बिझनेस करस्पॉन्डंट यांसारख्या सुविधांमुळे अनेक बँकिंग सेवा सातही दिवस उपलब्ध आहेत. त्यामुळे ग्राहकसेवेचे कारण देऊन पाच दिवसांच्या आठवड्याला विरोध करणे विसंगत असल्याचा दावा संघटनांनी केला आहे.

ग्राहकसेवा सुधारण्यासाठी पुरेसे प्रशिक्षित मनुष्यबळ, सक्षम डिजिटल व्यवस्था, प्रभावी तक्रार निवारण आणि रिक्त पदांची भरती आवश्यक आहे. शाखांमधील कर्मचारी कमतरता दूर करण्याऐवजी कंत्राटी व आउटसोर्सिंगवर भर देणे योग्य नसल्याची भूमिकाही संघटनांनी मांडली.

द्विपक्षीय करारानुसार कर्मचारी व अधिकाऱ्यांसाठी निश्चित केलेल्या झशीषीरपलश डळपज्ञशव खपलशपींळींश योजनेच्या अंमलबजावणीत भेदभाव केला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. उच्चपदस्थ व्यवस्थापनासाठी स्वतंत्र आणि अधिक लाभदायक योजना लागू करण्याऐवजी बँकेच्या यशात योगदान देणाऱ्या सर्व स्तरांतील कर्मचाऱ्यांना न्याय्य पद्धतीने प्रोत्साहन मिळावे, अशी मागणी आहे. बँकेची कामगिरी ही केवळ वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्रयत्नांमुळे होत नाही. सफाई कर्मचारी, अधीनस्थ कर्मचारी, ग्राहकसेवा कर्मचारी, अधिकारी, तांत्रिक कर्मचारी, कर्जवसुली कर्मचारी आणि प्रशासकीय कर्मचारी यांच्या सामूहिक योगदानातून बँकेची प्रगती होते. त्यामुळे प्रोत्साहनाचे लाभही न्याय्य पद्धतीने वितरित झाले पाहिजेत, असे संघटनांचे म्हणणे आहे.

उच्चपदस्थांच्या आर्थिक लाभांना केवळ अल्पकालीन नफा, व्यवसायवाढ किंवा कर्जवाटपाच्या लक्ष्यांशी जोडल्यास अधिक जोखीम घेण्याची प्रवृत्ती वाढू शकते. त्याचा परिणाम भविष्यात बँकांच्या कर्जगुणवत्तेवर होऊन अनुत्पादक मालमत्ता वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे प्रोत्साहन योजना तयार करताना दीर्घकालीन कर्जगुणवत्ता, वसुली, अनुपालन, ग्राहकसेवा आणि जोखीम नियंत्रणाचा विचार करावा, अशी मागणी आहे.

११ सप्टेंबरचा संप हा संघर्षाची सुरुवात असल्याचे कॉ. प्रकाश कोटा यांनी सांगितले. मागण्या मान्य न झाल्यास २८, २९ आणि ३० सप्टेंबर रोजी तीन दिवसांचा संप करण्यात येणार आहे. त्यानंतरही सरकारने मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास ऑक्टोबरमध्ये बँक कर्मचारी बेमुदत संपाच्या दिशेने जाणार असल्याचा इशारा त्यांनी दिला.

बँक कर्मचाऱ्यांचा संघर्ष हा ग्राहकांच्या विरोधात नसून, पुरेसे मनुष्यबळ, सुरक्षित कार्यपद्धती, न्याय्य सेवाशर्ती आणि उत्तरदायी व्यवस्थापनासाठी असल्याचे संघटनांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे ११ सप्टेंबरचा संप हा केवळ सुट्टीच्या मागणीचा प्रश्न नसून द्विपक्षीय कराराच्या अस्तित्वाचा आणि औद्योगिक लोकशाहीच्या विश्वासार्हतेचा प्रश्न असल्याचे सांगण्यात आले आहे.

# मातीशी नाळ जोडलेल्या माणसांमुळेच प्रवरेचा नावलौकिक

### राधाकृष्ण विखे पाटील यांचे प्रतिपादन

लोणी – ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकरिता स्थापन झालेल्या प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचा नावलौकिक गुणवत्तेमुळे टिकून आहे. दीड लाखांहून अधिक माजी विद्यार्थी यशस्वीपणे विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत, ही संस्थेची उपलब्धी असून, मातीशी एकरूप झालेल्या माणसांच्या समर्पित भावनेमुळेच ‘प्रवरेचा’ विश्वास आणि वेगळेपण सिद्ध होत असल्याचे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.





प्रवरा अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी आणि पालकांच्या स्नेहसंवाद कार्यक्रमात मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी विद्यार्थ्यांचा सत्कार केला.

संस्थेच्या प्रवरा अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी आणि पालकांच्या स्नेहसंवाद कार्यक्रमात मंत्री विखे पाटील बोलत होते. संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, संचालक शांतीनाथ आहेर, सहसचिव भारत घोगरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, प्राचार्य डॉ. संजय गुल्हाणे, प्राचार्य डॉ. व्ही. आर. राठी यांच्यासह विद्यार्थी, पालक, विभागप्रमुख आणि प्राध्यापक उपस्थित होते. प्रवेश परीक्षेमध्ये गुणवत्तेने यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार याप्रसंगी करण्यात आला.

आपल्या भाषणात मंत्री विखे पाटील म्हणाले की, महाविद्यालयाच्या वाटचालीचा आढावा घेताना शैक्षणिक क्षेत्रात होत असलेल्या बदलांचे प्रतिबिंब हे महाविद्यालयाच्या प्रगतीमधून पाहायला मिळत आहे. शेतकऱ्यांच्या मुलांनी सिद्ध करून दाखविलेली गुणवत्ता हा संस्थेचा अभिमान असून, यातूनच विद्यार्थी आणि पालकांच्या विश्वासाचे नाते निर्माण झाले आहे. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेने गुणवत्तेमध्ये कधीही तडजोड केली नाही, उलट अभियांत्रिकी क्षेत्रातील विविध प्रयोगांमधून राज्याला दिशा दिली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशोगाथा त्यांना निर्माण करून दिलेल्या संधींमुळेच आज पाहायला मिळतात.

या संस्थेमधून दीड लाखांहून अधिक विद्यार्थी पदवी घेऊन बाहेर पडले आहेत. देशातील आणि परदेशातील विविध शहरांमध्ये या सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले असून, नामवंत कंपन्यांमधून त्यांनी एकप्रकारे प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचा नावलौकिकही वाढवला आहे. देशाच्या संरक्षण उत्पादनामध्ये महत्त्वाचे योगदान देणाऱ्या गणेश निबे या माजी विद्यार्थ्याचा विशेष उल्लेख करून मंत्री विखे पाटील म्हणाले की, केवळ संरक्षण उत्पादनच नाही, तर आता ’निबे स्पेस’च्या माध्यमातून खासगी अंतराळ क्षेत्रातही त्यांनी सुरू केलेले मार्गक्रमण हे सर्वांना प्रेरणा देणारे आहे.

संस्थेमध्ये पन्नास हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यामुळे या भागात साक्षरतेचे प्रमाण सर्वाधिक असून, चार किलोमीटर अंतरावर हायस्कूल आणि सहा किलोमीटर अंतरावर कनिष्ठ महाविद्यालय असल्यामुळे चांगले शैक्षणिक वातावरण निर्माण होऊ शकले. येथे येणारा विद्यार्थी हा प्रवरा परिवाराचा घटक होतो. मातीशी बांधिलकी असलेल्या आणि एकरूप झालेल्या माणसांमुळेच प्रवरेचे वेगळेपण सिद्ध होत असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले.

याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, प्राचार्य डॉ. संजय गुल्हाणे यांचीही भाषणे झाली. संस्थेतील माजी विद्यार्थिनी सलोनी पुलाटे, सायली बहिरट आणि पालक प्रतिनिधी म्हणून आशिष जाधव, श्रीमती भाग्यश्री देशमुख, तसेच प्रवेश समन्वयक अनिल लोंढे यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

मी सुद्धा प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचा माजी विद्यार्थी असून माझे शिक्षण याच संस्थेत झाले आहे, राज्यातील पहिली इंग्रजी माध्यमातील शाळा १९६४ साली पद्मश्रींनी स्थापन केली, त्याच शाळेत माझे शिक्षण झाले. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील हिने सुद्धा पहिली ते बारावीपर्यंतचे शिक्षण याच संस्थेत घेतले आहे. त्यामुळे येथील माणसांनी ही संस्था कमालीच्या आत्मीयतेने जोपासली आणि वाढविली आहे, ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी आवर्जून सांगितले.



गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पेमराज सारडा महाविद्यालायातील विद्यार्थ्यांसाठी गणपती बनवा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

# विद्यार्थ्यांनी साकारले शाडू मातीचे श्रीगणेश

### ‘सारडा’चा पर्यावरणपूरक उपक्रम

नगर – लवकरच सुरु होणाऱ्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पेमराज सारडा महाविद्यालायातील विद्यार्थ्यांसाठी गणपती बनवा कार्यशाळेचे आयोजन झाले. यामध्ये विद्यार्थ्यांनी शाडू मातीचे श्रीगणेश साकारून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. ज्येष्ठ शिल्पकार अशोक डोळसे यांनी या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना शाडू मातीचे गणपती बनवण्याचे प्रशिक्षण दिले.

या कार्यशाळेचे उद्घाटन हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव सुमतीलाल कोठारी व चेअरमन मधुसूदन सारडा यांच्या हस्ते गणपतीच्या मूर्तीच्या पूजनाने झाले. यावेळी संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, संचालक डॉ.पारस कोठारी, प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, उपप्राचार्य गिरीश पाखरे, पर्यवेक्षक सुजित कुमावत, बागडपट्टी शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे, अशोक असेरी यांच्यासह प्रध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना सुमतीलाल कोठारी म्हणाले, सध्याच्या एआयच्या युगात विद्यार्थी व युवा मोठ्याप्रमाणात मोबाईल मध्ये गुंतले आहेत. त्यांना यापासून काहीकाळ परावृत्त करण्यासाठी गणपती बनवा कार्यशाळा उपयुक्त ठरली आहे. यामध्ये विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने श्रीगणेशाच्या मूर्ती साकारण्याचा अनोखा आनंद घेत पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घेतला आहे.

यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा यांनी कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सर्वांना रोख बक्षिसे दिली. गणपती बनवा कार्यशाळेचे आयोजन प्रा.मानसी केळकर, प्रा. भावना वैकर, प्रा. पल्लवी जोशी, प्रा.प्रसाद बेडेकर, प्रा.हर्षद पांडे, प्रा.अश्विनी नगरकर व प्रा.शिवानी तीवतेने यांनी केले.




नगरसेवक संपत बारस्कर यांनी आपला प्रभाग २०२९ पर्यंत एक घर -एक आंबा झाड करायचे ठरवले असून त्याप्रमाणे पूर्ण प्रभागात आंब्याची मोठी झाडे लावण्यात येत असून सावेडीतील गावडे मळा येथील जिव्हेश्वर शिवालय मंदिर परिसरात आंब्याची झाडे लावण्यात आली. यावेळी संपत बारस्कर, रोशनी त्रंबके, वैभव आहेर आदी.

## देवकर यांच्या गणेश मूर्ती विक्री केंद्राला यंदाच्या वर्षी ५१ वर्षे पूर्ण

नगर – नगरच्या देवकर कुटूंबाने सन १९७५ पासून स्व. नारायणराव देवकर यांच्या प्रेरणेने पुणे येथे सुरू केलेल्या श्री गणेशमूर्ती विक्री केंद्राला यंदा ५१ वर्ष पूर्ण होत असून ह्या गौरवशाली प्रवासामुळे देवकर परिवाराला अधिक मोठी व्यवसायीक उंची प्राप्त झाले आहे, अशी भावना व्यक्त करून संचालक लक्ष्मण देवकर

यांनी सर्व पुणेकर गणेशभक्ताचे आभार मानले. या गौरवशाली परंपरेमुळे पुण्यातही नगरचे नाव उंचावले आहे.

स्व. नारायणराव देवकर यांचे आदर्श मार्गदर्शन आणि त्यांनी दिलेले संस्कार व तसेच असंख्य ग्राहक, हितचिंतक, सामज बांधव, गणेशभक्त आणि पुणेकर नागरीक यांचे मनापासून मिळत असलेला प्रतिसाद यामुळे देवकर परिवार पुणे येथील गणेशमुर्ती विक्री व्यवसायात भक्कम स्थान निर्माण केले.

# गगनगिरी महाराजांच्या आश्रमात १३ सप्टेंबर रोजी भंडारा कार्यक्रम

नगर – सालाबादप्रमाणे याही वर्षी श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थान, शिव मल्हार सेवाभावी संस्था तसेच समस्त ग्रामस्थ पिंपळगाव रोठा (ता. पारनेर, मुंबईकर) व पुणेकर मंडळी यांच्या संयुक्त विद्यमाने खोपोली आश्रम येथे भंडारा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.



सिद्ध तपस्वी स्थळ पाताळगंगा क्षेत्री खोपोली आश्रम विश्व शान्ति गौरव पुरस्कार प्राप्त गगनगिरी महाराज समाधी स्थळ खोपोली येथे १३ सप्टेंबर रोजी सकाळी १० वा. होम, हवन, यज्ञ, पुजा, पूर्णाहुती व भंडारा महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सर्व भाविकांनी व ग्रामस्थांनी, मुंबईकरांनी या सोहळ्याला उपस्थित राहुन गगनगिरी महाराजांचा कृपा आशिर्वाद मिळवावा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा.

गेल्या अनेक वर्षांपासून चालत आलेला हा भंडारा कार्यक्रम अतिशय भक्तिमय वातावरणात होत असतो. साधारण स्वरूपात सुरु झालेला हा कार्यक्रम आज मितिस भव्य अशा स्वरूपात वाढलेला आहे. मुंबई, पुण्यावरूनच नव्हे तर गावावरून सुध्दा प्रचंड बहुसंख्येने ग्रामस्थ या सोहळ्यासाठी उपस्थित राहतात व गगनगिरी महाराजांचा कृपा आशीर्वाद घेतात, ही अभिमानाची व आनंदाची गोष्ट आहे, सर्वांची भक्ती आणि श्रद्धा यातून दिसून येते.

याही वर्षी या कार्यक्रमास उपस्थित राहावे व या भक्तिभाव सोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन श्री क्षेत्र स्वयंभु कोरठण खंडोबा देवस्थान कोरठणगड, शिव मल्हार सेवा भावी संस्था मुंबई, समस्त ग्रामस्थ पिंपळगाव रोठा, मुंबईकर व पुणेकर मंडळी यांच्यावतीने करण्यात आले आहे.

